



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक २५० * नांदेड * गुरूवार, दि. १८ सप्टेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# भारत धमक्यांना घाबरत नाही, घरात घुसून मारतो -नरेंद्र मोदी

**भोपाळ (प्रतिनिधी)–** हा नवा भारत आहे, तो कोणत्याही अणुबॉम्बच्या धमक्यांपासून घाबरत नाही. हा नवा भारत घरात घुसून मारतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि.१७) मध्य प्रदेशातील धार येथे जनतेला संबोधित करताना सांगितले.



पुढे पंतप्रधान मोदी म्हणाले की, पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी आपल्या माता-बहिणींचं सिंदूर पुसलं होतं. आम्ही 'ऑपरेशन सिंदूर' करून दहशतवादी तळं उद्धवस्त केली. आपल्या शूर जवानांनी डोळ्याच्या पापण्याही न हलवता पाकिस्तानला गुडघ्यावर आणलं. कालच एका पाकिस्तानी दहशतवाद्याने रडत-रडत आपली अवस्था सांगितली आहे. हा नवा भारत आहे तो कोणत्याही अणुबॉम्बच्या धमक्यांपासून घाबरत नाही. हा नवा भारत घरात घुसून मारतो. मोदी पुढे म्हणाले, आज कौशल्य आणि निर्माणाचे देव भगवान विश्वकर्मा यांची जयंती आहे. मी भगवान विश्वकर्मा यांना नमन करतो. आपल्या कौशल्याच्या जोरावर राष्ट्रनिर्माणात झोकून देणाऱ्या कोट्यवधी बांधवांना मी आदरपूर्वक प्रणाम करतो. धारची ही भूमी पराक्रमाची भूमी आहे, प्रेरणेची भूमी आहे. महाराज भोज यांचे शौर्य आपल्याला राष्ट्रगौरवासाठी लढण्याची शिकवण देतं. महर्षी दधीचि यांचा त्याग आपल्याला मानवतेच्या सेवेचा संकल्प देतो. या वारशातून प्रेरणा घेत आपण आज मातृभूमीच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देतो.

त्यानंतर मोदी म्हणाले, १७ सप्टेंबर हा आणखी एक ऐतिहासिक दिवस आहे. याच दिवशी देशाने सरदार पटेल यांची फौलादी इच्छाशक्ती पाहिली होती. भारतीय लष्कराने हैदराबादला अत्याचारांतून मुक्त केलं आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करत भारताचा गौरव पुन्हा प्रस्थापित केला. देशाच्या या मोठ्या यशाची अनेक दशकं कोणी आठवणही घेत नव्हतं. पण तुम्ही मला संधी दिली, आणि आमच्या सरकारने १७ सप्टेंबर आणि हैदराबादच्या घटनेला अमर केलं. आपण हा दिवस 'हैदराबाद लिबरेशन डे' म्हणून साजरा करायला सुरुवात केली आहे.

# नांदेडमध्ये दिल्लीच्या एनआयए पथकाकडून एकाची पाच तास चौकशी




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या चैतन्यनगर परिसरातील बी अॅण्ड सी कॉलनी भागात राहणाऱ्या एका युवकाची दिल्ली येथून आलेल्या एनआयएच्या पथकाने तब्बल पाच तास चौकशी केली. याबाबत कमालीची गोपनियता बाळगण्यात आली.

बी अॅण्ड सी कॉलनीत राहणाऱ्या सदर युवकाच्या वडीलाचे चैतन्यनगरमध्ये बेकरीचे दुकान आहे. दिल्ली येथील पथक नांदेड पोलिसांच्या मदतीने बुधवार, दि. १७ सप्टेंबर रोजी पहाटे तीन वाजता धडकले. सदर युवकास ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. याबाबत मात्र पथकाने आणि नांदेड पोलिसांनी कमालीची गोपनियता पाळली. विशेष म्हणजे हा परिसर शहराच्या विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतो. विमानतळ पोलिसांनाही याबाबत सविस्तर माहिती नव्हती. चौकशीनंतर सकाळी या पथकाने विमानतळ ठाण्यात नोंद करून दिल्लीकडे प्रयाण केले. या चौकशी मुळे शहरात सर्वत्र खळबळ उडाली असून नेमकी चौकशी कोणत्या प्रकरणात करण्यात आली याबाबत मात्र चित्र स्पष्ट झाले नाही.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

## अतिवृष्टीग्रस्त बाधितांना लवकरच मदत केली जाईल -पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मागील महिन्यात मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीचे पंचनामे प्रशासनाने करुन त्यांचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे. अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी राज्य शासन सकारात्मक असून लवकरच बाधितांना मदत उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त माता गुजरीजी विसावा उद्यानात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रारंभी हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पालकमंत्री अतुल सावे व मान्यवरांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पोलीस पथकाने धून वाजवून हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना दिली.

यावेळी राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. बालाजी कल्याणकर, आ. भीमराव केराम, आ. आनंदराव तिडके, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, सहायक जिल्हाधिकारी अनन्या रेड्डी व ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानीं, नागरिक, पत्रकार आदींची उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्र्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. नांदेड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात मोठया प्रमाणात अतिवृष्टी होवून अनेक घरे, शेती, जनावरे, रस्ते पाण्याखाली गेली. या परिस्थीतीचे व्यापक प्रमाणात पंचनामे करुन नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी शासनाकडे पायाभुत सुविधासाठी ३२३ कोटी ७१ लाख रुपये व शेतपिकांचे नुकसानीसाठी ५५३ कोटी ४८ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. या मागणीबाबत राज्य शासन सकारात्मक असून लवकरच मदत उपलब्ध करुन



देण्यात येईल असे पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

जिल्ह्यात मागील महिन्यात जी अतिवृष्टी झाली यामुळे नागरिकांच्या घरात पाणी जावून १५ हजार ४४५ कुटूंब बाधित झाली. या बाधित कुटूंबाना १ कोटी १३ लाख २० हजार रुपये एवढी मदत रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित कुटूंबाना मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे ५२९ जनावरे मयत झाली असून ४६ लाख ९२ हजार रुपयांची मदत वितरीत करण्यात आली असून उर्वरित प्रकरणाशी संबंधित वितरणाची कार्यवाही सुरु असल्याची माहिती पालकमंत्री यांनी दिली.

नांदेड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमी प्रयत्नशिल असून दळणवळणासाठी शासन स्तरावर नेहमी प्रयत्न केले आहेत. नांदेड येथून नुकतीच वंदे भारत एक्सप्रेस व विमानसेवा पुर्ववत सुरु झाली आहे. यामुळे आता नागरिकांना दळणवळणाची सुविधा प्राप्त होवून उद्योग व्यवसाय व नांदेडच्या विकासाला चालना मिळणार असल्याचेही पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

# गोदावरी नदीतील बॅक वॉटरमुळे अनेकांच्या घरात पाणी; ६ जणांना सुरक्षितस्थळी हलविले

**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी नदीपात्रात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यामुळे नदीला पूर आला आहे. नदीतील बॅक वॉटरमुळे पंचवटीनगर वसरणी येथील अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे. यावेळी येथील ६ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.





दि. १७ सप्टेंबर रोजी पंचवटी नगर वसरणी येथील गोदावरी नदीतील बॅक वॉटरमुळे जमा झालेल्या ८ ते १० फिट पाण्यातून बालाजी अन्नपूर्णे (वय ३२), अजय अन्नपूर्णे (वय २७), रेणुका अन्नपूर्णे (वय २०), शिवनंदा अन्नपूर्णे (वय ४९), महालाबाई विठ्ठलराव महात्मे (वय ६५), विठ्ठलराव शेषेराव महात्मे (वय ७९) या सहा जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

सदरील ठिकाणी अग्निशमन अधिकारी के. एस.दासरे उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, बी.लांडगे, उमेश ताटे, पवळे, नरवाडे, मगरे यांनी बचावकार्य करून लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविले आहे, अशी माहिती प्रशासनाच्यावतीने दिली आहे.

# मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर लाल रंग टाकला, ठाकरेंची सेना आक्रमक

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवाजी पार्क परिसरात काहीशी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. अज्ञात व्यक्तीने मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्यावर लाल रंग फेकल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर शिवसैनिकांनी पुतळ्याची साफसफाई केली आहे. पोलीस सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने आरोपीचा शोध घेत आहेत.

दादरच्या शिवाजी पार्कवरील पुतळ्याशी संबंधित ही घटना घडली आहे. काल रात्री कोणीतरी हा लाल रंग टाकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हा लाल रंग नेमका कोणी टाकला याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. ठाकरे गटाकडून यासंदर्भात तक्रार आल्यास तक्रार दाखल करण्यात असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. परिसरातील सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. ठाकरे गटाकडून तक्रार न झाल्यास पोलीस स्वतः तक्रार दाखल करणार आहेत. बाळासाहेब ठाकरे यांची पत्नी मीनाताई ठाकरे यांना शिवसैनिक प्रचंड मानायचे. १९९५ साली मीनाताई ठाकरे यांचे निधन झाले होते. त्यानंतर शिवाजी पार्क परिसरात त्यांचा अर्धकृती पुतळा उभारण्यात आला होता. गेल्या अनेक वर्षांपासून हा पुतळा याठिकाणी आहे. सकाळी सहाच्या सुमारास ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांना यासंदर्भातील सीसीटीव्ही फुटेज मिळाले आहे. त्यामध्ये एक व्यक्ती दिसत आहे. या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी संबंधित व्यक्तीचा शोध सुरु केला आहे.

# बीडमध्ये पहिली रेल्वे सुरू

**बीड (प्रतिनिधी)–** मराठवाड्यातील बीडमध्ये आज रेल्वे नाही तर विकासाची वाहिनी पोहोचली आहे, त्या माध्यमातून विकासकामांना वेग मिळेल. बीडमध्ये सुरू झालेली ही रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण करतो असं वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

बीड ते अहिल्यानगर अशी रेल्वे सुरू झाली असून त्या गाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवला. बीड जिल्ह्यासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने बीड शहरात प्रथमच रेल्वे धावत आहे. यामुळे केवळ बीडकरांमध्येच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यात उत्साहाचे वातावरण आहे, असे फडणवीस म्हणाले.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ

## स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान आरोग्य यंत्रणेने यशस्वीपणे राबवावे -पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वस्थ नारी, सशक्त परिवार या राष्ट्रीय अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मध्यप्रदेश राज्यातील धार येथून आज करण्यात आला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण येथील जिल्हा नियोजन भवन सभागृहात दूरदृश्यप्रणालीद्वारे दाखविण्यात आले. या निमित्ताने नांदेड जिल्हास्तरावरील स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे उद्‌घाटन पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते जिल्हा नियोजन भवन येथे पार पडले.

महिलांच्या आरोग्यासाठी आरोग्य यंत्रणेतील सर्व टिमने स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान यशस्वीपणे राबवावे, अशी सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी केली.



या कार्यक्रमास राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी अनन्या रेड्डी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी, महिला, नागरिक आदींची उपस्थिती होती.

या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन, उपचार केले जाणार आहे. कार्यक्रमात अवयवदानाची शपथ देण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी आरोग्य शिबिराबाबत माहिती देऊन आरोग्य शिबिराचा जिल्ह्यातील महिला लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. आज स्त्री रुग्णालय श्यामनगर नांदेड आणि उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथे झालेल्या आरोग्य शिबिरात १ हजार १७५ महिला लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर २४ नागरिकांनी रक्तदान केले आहे. अशी माहिती आरोग्य यंत्रणेकडून देण्यात आली. शेवटी स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक डॉ. मनुरकर यांनी आभार मानले.




# शहरातील वाहतूक समस्या; डीआयजी शहाजी उमाप यांनी घेतली महापालिका, आरटीओ आणि वाहतूक शाखेची बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील सतत विस्कळीत होणारी वाहतूक सुरळीत राहावी व नांदेडकरांना त्याचा फटका बसू नये, याकरिता स्वतः पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी शहर वाहतूक शाखा, नांदेड पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक आपल्या कार्यालयात घेऊन त्यांना वाहतूक समस्यांवर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.




पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयात नांदेड शहरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

शहाजी उमाप यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन नांदेड शहरातील वाहतूक समस्या व वाहतूक नियमनांचे अनुषंगाने उमाप यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड शहरातील वाहतूक समस्येबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर प्रत्येक विभागासोबत चर्चा करुन विविध विषया संबंधाने सुचना देण्यात आल्या. त्या याप्रमाणे की, नांदेड शहरात बंद असलेले सिग्नल सुरु करणे अथवा नवीन बसविणे, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी रस्त्याची कामे लवकरात लवकर पूर्ण करावे व रस्त्यावरील खड्डे वगैरे कामे करुन घ्यावे, प्रादेशिक परिवहन अधिकारी व ट्राफिक पोलीस यांनी समन्वय साधून वाहतूक समस्या कशा प्रकारे सोडविता येईल याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. तसेच आठवडी बाजार स्थलांतरीत करणे आणि हॉकर्स झोन रेगुलेशन, मोर्चा मार्ग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर बैठकीस एसपी अबिनाश कुमार, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनय अहिरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गलधर, महापालिकेचे कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंक्रेज, महापालिका उपअभियंता अरुण शिंदे, ओमप्रकाश काळे, ढवळे, नवनाथ सोनटक्के, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे, जगन पवार यांची उपस्थिती होती.

# १ कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार -मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचे कर्ज देऊन त्यांना शासन आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करुन त्या स्वावलंबी होतील. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प असल्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' चा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. यावेळी त्यांनी घोषणा केली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# भूऔष्णिक ऊर्जेचा नवसंजीवनी मार्ग

आजच्या आधुनिक युगात वीज ही कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीची किल्ली ठरली आहे. पारंपरिक स्त्रोतांवर अवलंबून राहणे, पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम, आणि वाढती मागणी पाहता, स्वच्छ, टिकाऊ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्या शोधात संपूर्ण जग आहे. अशा वेळी भूऔष्णिक ऊर्जा म्हणजेच जमिनीच्या गर्भातून मिळणारी उष्णता, ही एक आशादायक पर्याय म्हणून पुढे येत आहे. भूगर्भातील खोल स्तरांमध्ये असणारी उष्णता अनेक वर्षांपासून पृथ्वीच्या नैसर्गिक प्रक्रिये-मुळे निर्माण होते. हीच उष्णता, गरम पाण्याच्या स्वरूपात किंवा वाफेच्या स्वरूपात जमिनीखाली साठलेली असते. ही वाफ जमिनीवर आणून टर्बाईन चालवली जाते आणि त्यातून वीज निर्माण होते. ही प्रक्रिया केवळ पर्यावरणपूरकच नसून, तुलनेने खर्चिकही कमी आहे आणि सातत्याने वीज देणारी आहे. भारतातील अनेक भागांमध्ये, विशेषतः हिमालयीन पट्ट्यात, वीज पुरवठा ही मोठी समस्या आहे. उंच पर्वतीय भागांमध्ये जिथे पारंपरिक वीज वितरणाची साधने पोहोचवणे अशक्य किंवा अतिशय खर्चिक आहे तिथे भूऔष्णिक ऊर्जा एक क्रांतिकारी पर्याय ठरू शकते. विशेषतः लडाखसारख्या दुर्गम भागात भूगर्भातून मिळणाऱ्या उष्णतेचा उपयोग करून १४,००० फुट उंचीवर वीजनिर्मिती करण्याचा प्रयत्न अंतिम टप्प्यात आहे. यासाठी आईसलँड या देशाची मदत घेतली जात आहे, जो आपली सुमारे २५% वीज गरज भूऔष्णिक ऊर्जेतून पूर्ण करतो. भारतासाठी ही भागीदारी एक अत्यंत महत्त्वाची पायरी ठरू शकते. भूऔष्णिक ऊर्जेच्या इतर ऊर्जा स्रोतांपेक्षा काही स्पष्ट फायद्यांवर नजर टाकली, तर ते असे दिसून येते की, ही ऊर्जा वर्षभर सतत मिळू शकते. पावसाळा, हिवाळा किंवा उन्हाळा यांचा परिणाम तिच्यावर होत नाही. सौर किंवा पवन ऊर्जेप्रमाणे यासाठी फार मोठ्या जागेची गरज लागत नाही. एकदा यंत्रणा उभी राहिल्यावर उत्पादन खर्च फारच कमी असतो. या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइड किंवा इतर प्रदूषक वायूंचा उत्सर्जन होत नाही, त्यामुळे पर्यावरणाला अत्यल्प हानी पोहोचते. भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण संस्थेच्या आकडेवारीनुसार, देशभरात ३८१ ठिकाणी भूऔष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारण्याची शक्यता आहे, आणि एकूण १,०६,००० मेगावॅट वीज या माध्यमातून निर्माण केली जाऊ शकते. ही संख्या आपल्या ऊर्जेच्या गरजांपुढे खूप मोठी भूमिका बजावू शकते. पण केवळ शक्यता असून चालत नाही. यासाठी आवश्यक आहे ती धोरणात्मक दृष्टीकोन, गुंतवणुकीस प्रोत्साहन देणारे निर्णय आणि संशोधनात सातत्य. सरकारने या क्षेत्रात अधिक लक्ष घालण्याची गरज आहे. खासगी क्षेत्र, संशोधन संस्था आणि आंतरराष्ट्रीय भागीदार यांना यात सामावून घेऊन भारताला या तंत्रज्ञानात जागतिक आघाडीवर नेण्याची संधी आहे. भारतीय सैन्य, सीमावर्ती गावं, दुर्गम भागातील आदिवासी लोक, आणि पर्यावरण रक्षणाची तातडीची गरज या सगळ्यांच्या संदर्भात विचार केला, तर भूऔष्णिक ऊर्जा ही केवळ पर्याय नाही तर एक गरज बनते. हिमालयात सतत तैनात असलेल्या जवानांसाठी सतत वीजपुरवठा होणे म्हणजे केवळ सुविधाच नव्हे तर सुरक्षा व्यवस्थेचा एक भाग आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ शहरांच्या विकासासाठी नव्हे, तर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी झाला पाहिजे. भूऔष्णिक ऊर्जा तंत्रज्ञान हे भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. सौर आणि पवन ऊर्जेसारखे पर्याय जरी लोकप्रिय असले तरी भूगर्भातील उष्णतेचा वापर ही एक स्थिर, स्वच्छ आणि अखंड ऊर्जा मिळवण्याची संधी आहे. आपल्या देशाला जर आत्मनिर्भर बनायचे असेल, तर अशा पर्यावरणपूरक आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास व विस्तार करणे अत्यावश्यक आहे. आज जर आपण भूऔष्णिक ऊर्जेकडे गांभीर्याने पाहिलं, तर उद्याचा भारत हे ऊर्जा सुरक्षित भारत म्हणून ओळखला जाईल, आणि हीच आपल्या विकासयात्रेतील खरी ऊर्जा असेल.

# आंतरराष्ट्रीय समान वेतन दिनाचे भारतीय संविधानाच्या प्रकाशात समाजशास्त्रीय चिंतन



मानव समाजाच्या इतिहासात असमानता ही जणू अपरिहार्य छाया ठरली आहे. जाती, वंश, धर्म, भाषा अशा विविध आधारांवर भेदभाव अनुभवला गेला; मात्र या सर्वात सर्वाधिक दीर्घकाळ आणि खोलवर ठसलेला भेदभाव म्हणजे स्त्री-पुरुष असमानता होय. मानवी सभ्यता जसजशी प्रगत होत गेली तसतसे 'समता' हे मूल्य केंद्रस्थानी आले. प्राचीन काळातील वंशभेद, जातीभेद, धर्मभेद या अडथळ्यांवर मात करत समाजा-ने लोकशाही, मानवाधिकार, सामाजिक न्याय अशा संकल्पना रुजवल्या आहेत. मात्र आजही लिंगभावभेदाच्या स्वरूपात असमानता टिकून आहे. स्त्री आणि पुरुष या दोन अर्धांगांनी समाजाची उभारणी झाली असली तरी श्रमाचे मोल ठरवताना स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे. घरगुती, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले. कालांतराने शिक्षण, लोकशाही मूल्ये, स्त्रीवादी चळवळी यामुळे परिस्थितीत बदल घडू लागला आहे. तरीदेखील समानतेच्या लढाईत 'समान कामासाठी समान वेतन' हा प्रश्न आजही निकाली लागलेला नाही. स्त्री-पुरुष दोघेही सारखे श्रम करत असले, समान जबाबदाऱ्या पार पाडत असले, तरीही वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना कमी मोबदला मिळत असतो. समान कामासाठी समान वेतन हा केवळ आर्थिक मुद्दा नाही; तर तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही तत्त्वांचा गाभा आहे. या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन' साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे स्त्रियांच्या हक्कांची, मानवी मूल्यांची आणि घटनात्मक तत्त्वांची आठवण करून देणारा एक जागतिक उपक्रम आहे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून सामाजिक न्यायाच्या प्रवासात आत्म परीक्षणाचा क्षण आहे.

भारतीय संविधान हे जगातील सर्वाधिक प्रगत लोकशाही दस्तावेजांपैकी एक मानले जाते. त्यात समतेच्या तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला कायद्यापुढे समानता दिली आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ मध्ये 'समानतेचा अधिकार' स्पष्टपणे नमूद केलेला असून, भारतीय संविधानातील अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभावास बंदी घालतो. तर अनुच्छेद १६ सार्वजनिक सेवांमध्ये किंवा नोकरीत समान संधीचे आश्वासन देतो. तसेच भारतीय संविधानातील अनुच्छेद ३९ (घ) राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये स्पष्टपणे नमूद करतो की पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन दिले जावे तर अनुच्छेद ४२ काम गारांच्या मानवीय हक्कांचे रक्षण करण्याचे बंधन घालतो. संविधानातील या तरतुदींमधून घटनाकारांनी स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा विचार किती गांभीर्याने केला होता हे स्पष्ट होते. या तरतुदींमधूनच हे स्पष्ट होते की समता ही आपल्या लोकशाहीचा पाया आहे. मात्र या हमींचे प्रत्यक्षातले चित्र पाहिले तर असमानता अनेक स्तरांवर पसरलेली असून घटनात्मक आश्वासन आणि प्रत्यक्ष अंम लबजावणी यामध्ये मोठी दरी आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास समान वेतनाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर तरतुदींचा किंवा काम गार धोरणांचा नाही, तर तो सत्ता-संरचनेशी जोडलेला आहे. शतकानुशतके पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरगुती जबाबदाऱ्यांपुरते मर्यादित केले गेले आहे. बालसंगोपन, घरकाम, वृद्धांची देखभाल या कामांना आर्थिक मूल्यच दिले गेले नाही. त्यामुळे स्त्रीच्या श्रमाचे अवमूल्यन झाले आहे. ही मानसिकता आजही कायम आहे. स्त्रिया कामाच्या ठिकाणी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले जाते. परिणामी स्त्रियांच्या श्रमांना 'अदृश्य काम' अशी ओळख मिळाली. त्या घराबाहेर कामासाठी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले गेले. यामुळेच ग्रामीण भागातील शेतमजुरी असो किंवा शहरी भागातील कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी असो, सर्व स्तरांवर स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

भारतातील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात स्त्रिया वीटभट्टी, बांधकाम, शेतमजुरी, मोलमजुरी, घरकाम या क्षेत्रांत काम करतात. त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी मिळते. शहरी भागातील शिक्षण घेतलेल्या स्त्रिया उद्योगधंद्यात, प्रशासनात, आयटी कंपन्यांत कार्यरत आ-हेत; तरीही त्यांचे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असते. या विषमतेला 'जेंडर पे गॅप' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार भारतातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २७ टक्क्यांनी कमी वेतन मिळते. असंघटित क्षेत्रात ही दरी आणखी मोठी आहे. जागतिक संदर्भात पाहिले तरी परिस्थिती फारशी वेगळी नसून हा प्रश्न गंभीर आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन विमेन' अह-वालानुसार जगभरातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरा-सरी २० टक्के कमी वेतन मिळते. काही प्रगत देशांनी यावर मात करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आ-हेत. आइसलँडने २०१८ पासून प्रत्येक कंपनीला समान वेतनाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. स्वीडन, नॉर्वे, फिनलंड यांसारख्या देशांत वेतन संरचना पारदर्शक ठेवली जाते. त्याच्या तुलनेत भारतात १९७६ मध्ये 'समान वेतन कायदा' करण्यात आला तसेच २०१९ मध्ये 'वेतन संहिता' लागू करण्यात आली. पण अंमलबजावणीच्या बाबतीत मर्यादा आहेत. तपासणी यंत्रणा कमी, महिलांच्या हक्कांविषयी जागरूकतेचा अभाव आणि असंघटित क्षेत्राची व्याप्ती मोठी असल्यामुळे कायद्यांचा परिणाम अपेक्षेइतका झाला नाही. भारतीय न्यायव्यवस्थेने मात्र 'समान कामासाठी समान वेतन' हा घटनात्मक तत्त्वांचा भाग असल्याचे ठाम पणे मांडले आहे. रणधीर सिंग विरुद्ध भारत संघ (१९८२) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव करणे हा घटनात्मक अधिकारांचा भंग आहे. इतर अनेक खटल्यांतही न्यायालयांनी स्त्रियांना समान वेतनाचा अधिकार दिला. पण प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अद्यापही अदृश्य अडथळे दिसून येतात. स्त्रियांना एका विशिष्ट पातळीपलीकडे बढती मिळत नाही, निर्णयक्षम पदांवर त्यांना पोहोचता येत नाही. हे आर्थिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर अन्यायकारक असून त्यामुळे आर्थिक व सामाजिक सत्तेतील असमानता अधिक गडद होते.

समान वेतनाची अंमलबजावणी केल्यास त्याचे परिणाम केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी सकारात्मक होतात. महिलांना योग्य मोबदला मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊन कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते. घरगुती निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर अधिक खर्च होतो. लवकर लग्न, हुंडा यांसारख्या प्रथा कमी होतात. मुलींचे शिक्षण वाढते आणि पुढील पिढ्या सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला समाजातील लोकशाही प्रक्रियेतही सक्रियपणे सहभागी होतात. त्यामुळे समान वेतन हा मुद्दा राष्ट्राच्या एकूण विकासाशी निगडित असून त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला गती मिळते. समाजशास्त्र सांगते की असमानतेविरुद्धची लढाई केवळ कायद्यांनी जिंकता येत नाही तर त्यासाठी प्रथम मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने या समस्येचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी उपायांची गरज आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये लिंगभाव समानतेचे मूल्य शिकवले गेले पाहिजे. माध्यमांनी स्त्रियांची प्रतिमा आदरपूर्वक आणि वास्तवदर्शी मांडली किंवा दाखवली पाहिजे. नियोक्त्यांनी वेतन संरचना पारदर्शक ठेवली पाहिजे. सरकारने वेतन संहितेची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान वेतनाची हमी देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारली पाहिजे. तसेच महिलांनी संघटित होऊन आपले हक्क मागितले पाहिजेत.

भारतीय संविधान हा आपल्या लोकशाहीचा कणा आहे. समता ही त्याचा आत्मा असून 'समता' हे मूल्य घराघरांत पोहोचले पाहिजे. स्त्री-पुरुष समानतेशिवाय लोकशाही अपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन आपल्याला याचीच जाणीव करून देतो. आज भारत डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप इंडिया यांसारख्या मोहिमा राबवतो आहे. पण या योजनांचा खरा यशस्वी परिणाम घडवायचा असेल तर स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांना न्याय्य मोबदला मिळणे अपरिहार्य आहे. समान वेतनाशिवाय विकास केवळ अर्धवट ठरेल. शेवटी एवढेच म्हणता येईल की, समान वेतन हा आर्थिक मुद्दा नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि घटनात्मक समतेचा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन हा स्त्री-पुरुष समतेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की खरी लोकशाही आणि खरी प्रगती तेव्हाच साध्य होईल जेव्हा स्त्री-पुरुषांना समान श्रमासाठी समान मोबदला मिळेल. ही जबाबदारी केवळ सरकारची किंवा न्यायालयांची नसून संपूर्ण समाजाची आहे. स्त्री-पुरुष समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाला आपला वाटा उचलावा लागेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# किती विरोधाभास! डिजिटल युगातही स्मार्ट मीटरला विरोध?



टिकटीक करणारी काट्याची मनगटी घड्याळ जाऊन तिथं स्मार्ट वॉच आली. साधे एरियल आणि बटन की-पॅड अस-लेले मोबाईल गेले आणि त्या ऐवजी ड्रॉइड स्मार्ट मोबाईल फोन आले. गरजेनुसार तेही आता एकेकाजवळ एकापेक्षा अधिक मोबाईल आहेत! प्रत्येकाच्याच घरात साध्या टिव्ही सेटच्या ठिकाणी स्मर्ट एलईडी टिव्ही आलेत. साध्या जून्या संगणकाच्या जागा आता अडव्हान्सड आणि न्यू जनरेशन्सच्या कम्प्युटर्स, लॅपटॉप व आयपॅडने घेतलेल्या आहेत. कार किंवा आराम जीपगाडीच काय तर स्कुटर-मोटार सायकलींच्याही पुढे जाऊन अगदी शेतातल्या ट्रॅक्टरसारख्या वाहना-वरही अत्याधुनिक एलईडी स्मार्ट डॅशबोर्ड आलेले आहेत. त्यासाठी कसलीच कचकच न करता अधिकचे हजारों रुपयेही अगदी सहजपणे मोजले जातायेत. एकंदरीत आता सगळीकडेच डिजिटल उपकरणे ही बदलत्या काळाची एक गरज म्हणून वापरली जात असतानाच, विनामूल्य बसविल्या जाणाऱ्या विजेच्या स्मार्ट मीटरला होणारा विरोध मात्र हस्यास्पद ठरतो.

प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी व्यवहार सोयीस्कर आणि गतिमान करण्यासाठी होतो. दिवसेंदिवस तंत्रज्ञानात अधिकाधिक सुधारणा घडून येत असून एक गरज म्हणून प्रत्येक संस्था किंवा व्यवस्थापनाकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार केला जातो. त्याला विद्युत क्षेत्रातील व्यवस्थापनही अपवाद असण्याचे काही कारण नसावे.

विद्युत क्षेत्रात आता पूर्वीसारखे ढोबळ व्यवहाराचे दिवस राहिलेले नाहीत. आता अधिकाधिक चांगल्या सेवा आणि काटेकोर आर्थिक शिस्तीला प्राधान्य द्यावे लागते. वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा अधिक महत्वाची असते. वीज पुरवठयाचे काम विद्युत वितरण कंपन्या करतात. राज्यात वितरणाचे काम महावितरण ही सरकारी कंपनी करते. कंपनीला अधिक चांगल्या सेवेसाठी पुरेशी वीज खरेदी आणि आवश्यक त्या पायाभूत सुविधा पुरवाव्या लागतात. त्यासाठी पुरेशा महसुलाची जुळवाजूळव करणे जिकरीचे बनले आहे. ग्राहकांनी वापरलेल्या विजेच्या बिलांची वसुली हाच महावितरणच्या महसुलाचा एकमेव स्त्रोत आहे. त्याच्या वसुलीसाठी ग्राहकांकडून वापरण्यात आलेल्या विजेचे वस्तुनिष्ठ वाचन आणि त्याचे अचुक बिलींग महत्वाचे असते. प्रामाणिक ग्राहकांनाही वीज वापराप्रमाणेच अचुक वीजबिलाची अपेक्षा आहे. अचुक बिलींगच्या माध्यमातून ग्राहक समाधान आणि विद्युत वितरण कंपन्यांच्या आर्थिक शिस्तीसह इतरही काही दृष्टीने विद्युत मीटर हा महत्वाचा घटक ठरतो.

आज घडीला विजेच्या मीटरच्या संदर्भाने अनेक प्रश्न समोर येताना दिसतायेत. काही ठिकाणी ग्राहकांच्या अज्ञानाचा किंवा चुकीच्या मानसिकतेचा फायदा उचलून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात येत असल्याचे दिसून येते. बेकायदेशीर पध्दतीने वीज वापर करुन विजेचा महसूल बुडविण्याचा किंवा चोरून वीज वापरण्याचाही काहींचा हेतु त्यामागे असावा. परंतु, तशा चुकीच्या हेतु किंवा मानसिकतेला कुणाचा पाठींबा असू नये. किमान तसा प्रयत्न कुण्या संघटना पातळीवरुन तरी होऊ नये. तसे होत असेलतर त्याला मानसिक मागासलेपण म्हणता येईल. वस्तुत: तांत्रिक प्रगती आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या वापराचा संबंध विकासाशी जोडलेला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक चांगल्या सेवा देण्याचाच कुठल्याही सरकारी व्यवस्थेचा हेतु असतो. विजेचे स्मार्ट मीटर देण्यामागेही महावितरणचा तोच उद्येश आहे.

प्रारंभिक काळात विजेची निर्मिती आणि तिचा वापर वाढू लागल्यानंतर तिचा ग्राहकांकडून होणारा वापर मोजण्याची गरज निर्माण झाली. विजेचे मीटर हेच वीज वापर मोजण्याचे एक साधन आहे. त्यासाठी प्रारंभी इल्क्ट्रो-मेकॅनिकल मीटरचा वापर करण्यात आला. त्यानंतरच्या काळात घडून आलेल्या तांत्रिक सुधारणेतून त्यात अनेक बदल होत गेले. परिणामी, इल्क्ट्रो-मेकॅनिकल मीटरनंतर इलेक्ट्रो-मॅग्नेटीक मीटरचा वापर सर्वत्र करण्यात आला. वीज वापर मोजण्याच्या तिथपर्यंतच्या मीटरच्या प्रवासात बहुतेक घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांच्या मीटरचे वाचन मॅन्युअली व्हायचे. मग ते वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून अथवा नियुक्त केलेल्या एजन्सी प्रतिनिधीकडून तर काही प्रसंगी प्रत्यक्ष ग्राहकांकडूनही व्हायचे. त्या मीटरचे वाचन आणि बिलींग मॅन्युअली असल्याने त्यातही अंदाजे-सरासरी वीजबिल, मीटर वाचनातील बेफिकीरी किंवा अन्य काही या ना त्या कारणाने वीज ग्राहकांच्या तक्रारी काही कमी नव्हत्या. तशा तक्रारींचीही महावितरणने वेळोवेळी सकारात्मक रितीनेच दखल घेतलेली आहे. शिवाय, मीटरच्या मूलभूत सुरक्षेचा आणि मीटरमध्ये करण्यात येणाऱ्या छेडछाडीतून होणाऱ्या वीज चोरीचीही समस्या गंभीर होती.

त्या तशा समस्या विचारात घेवून एक प्रभावी उपाय म्हणून विद्युत क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर अधारित अशी इलेक्ट्रॉनिक स्वरुपातली रेडीओ फ्रिक्वेंशी आणि इन्फ्रारेड वीज मीटर वापरण्यात आले. राज्यातही सर्वत्र तसे मीटर बसविण्यात आलेले आहेत. त्या मीटरचे वाचन हॅन्ड हेल्ड युनिट मशीनद्वारे किंवा सुरक्षित नेटवर्क प्रणालीद्वारे स्वंयचलित पध्दतीने होते. त्याच्या वाचनातील मानवी हस्तक्षेप टाळण्यात आला होता. प्रारंभी त्याही मीटरला काही खोडकर वीज ग्राहकांनी हेतुपुरस्सर विरोध केलेला होता.

अलिकडे केंद्र आणि राज्य सरकारद्वारे सौर ऊर्जा निर्मिती आणि तिच्या वापराला प्राधान्य दिलेले आहे. पारंपरिक ऊर्जेच्या तुलनेत ही वीज स्वस्त, सुरक्षीत आणि प्रदुषणविरहीत आहे. राज्यात प्रधानमंत्री सौर घर मोफत वीज योजनेसह मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेच्या प्रभावी अमलबजावणीने सौरऊर्जा क्रांती घडविता आली आहे. परिणामी, सौरऊर्जेच्या माध्यमातून महावितरणला पहिल्यांदाच यावर्षी वीजदर कपात करता आली. ही बाब नक्कीच भूषणावह मानली पाहिजे.

विषय आहे तो वीज मीटर बदलण्याचा. व्यावहारिक गरज आणि तंत्रज्ञानातील सुधारणा आलेखा नुसार आजपर्यंत आपण इल्क्ट्रो-मेकॅनिकल आणि इलेक्ट्रो-मॅग्नेटीक मीटरनंतर अगदी अलिकडच्या काळात इलेक्ट्रॉनिक स्वरुपातली रेडीओ फ्रिक्वेंशी आणि इन्फ्रारेड वीज मीटरचा वापर केलेला आहे. त्याही पुढे जाऊन आता नवतंत्रज्ञानाने विजेचे टीओडी स्मार्ट मीटर आणलेले आहे. वाढते सौरऊर्जा उत्पादन आणि वाढत्या वापरामुळे टीओडी स्मार्ट मीटरची गरज अधिकपणे अधोरेखीत झालेली आहे. वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक बनलेले आहे. ग्राहकाने कोणत्या वेळेत वीज वापरली, त्यानुसार वीज दरात सवलत देण्याची तरतूद आयोगाने सांगितली आहे. सायंकाळी पाच ते रात्री बारा वाजेपर्यंतचा व पहाटे पाच ते सकाळी नऊ वाजेपर्यंतचा काळ उच्चांकी वीज मागणीचा असतो. त्यावेळातील वीज वापराचे विजेचे दर इतर साधारण अर्थात सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेदरम्यानच्या सौर कालावधीतील दरापेक्षा तुलनेने अधिक असतात. आयोगाच्या निर्देशानुसार आता ग्राहकांना उच्चांकी वीज मागणी काळ आणि सौर कालावधीचा काळ याप्रमाणे व हंगामाप्रमाणे वीजदर आकारणे आवश्यक आहे. त्यासाठी टीओडी स्मार्ट मीटर गरजेचे आहे. कारण हेच मीटर वेळेनुसार विजेच्या वापराची रिअल टाईममध्ये नोंद ठेवते. शिवाय, टीओडी स्मार्ट मीटर हे ए एम आर प्रणाली अर्थात स्वंयचलित प्रणालीवर आधारित आहे. त्यामुळे त्याच्या वाचनात व अंकेक्षणात मानवी हस्तक्षेपाला कुठेही वाव नाही. त्याद्वारे होणारी वीज वापराची नोंद अचुक आणि वेळेवर घेतली जाते. परिणामी ग्राहकांना वापराप्रमाणेच योग्य वीजबिल मिळेल. त्यातून ग्राहकांच्या बिलासंदर्भातील तक्रारी शून्यावर येतील. शिवाय, ग्राहकांना वीजसेवेच्या संदर्भांने मेसेजेस देण्याचीही व्यवस्था याद्वारे होईल. ग्राहकांना त्यांचा वीज वापर कधीही तपासण्याची सुविधा यात आहे. या मीटरमुळे मीटर रिडींगसाठी कर्मचाऱ्यांवरचे अवलंबित्वही संपणार आहे. एकूणच टीओडी स्मार्ट मीटर ग्राहकांसह विद्युत वितरण व्यवस्थेच्याही फायद्याचे ठरते. त्यास होणारा विरोध निरर्थक आणि हस्यास्पद ठरतो.

**- डॉ. मोहन दिवटे**
जनसंपर्क अधिकारी
महावितरण, परिमंडल कार्यालय,
नांदेड

# कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे. श्रीलंका आणि बांगलादेशांत जे घडले तेच नेपाळमध्ये घडत आहे. नेपाळच्या के पी शर्मा ओली सरकारने सोशल मीडियावर बंदी घातल्यावर तेथील तरुणाईने (जेन झी) मोठा उठाव केला. हा उठाव इतका मोठा होता की नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओ-ली यांना पदावरून पायउतार व्हावे लागले. त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना आंदोलकांनी पळूपळू मारले. त्यांची धिंड काढली. नेपाळच्या माजी पंतप्रधानांच्या पत्नीला जिवंत जाळले. राजकीय नेत्यांची घरे जाळली. सरकारी कार्यालयाला आगी लावल्या. नेपाळची संसद आणि सर्वोच्च न्यायालय जाळून खाक केले. या आंदोलनात ५१ नागरिक मरण पावले तर १३०० हून अधिक नागरिक जखमी झाले. नेपाळमध्ये जे घडले तेच श्रीलंकेमध्ये तीन वर्षापूर्वी घडले. बांगलादेशातही मागील वर्षी तेच घडले.

श्रीलंका आणि बांगलादेशच्या पंतप्रधानांना सत्ता सोडून परदेशात पळ काढावा लागला. त्याचीच पुनरावृत्ती नेपाळमध्ये झाली. नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली हेही देश सोडून पळून गेले. त्यामुळे नेपाळच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांनी नेपाळच्या हंगामी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात आश्रय घेतल्यावर तिथे राजकारणाबाहेरील व्यक्ती असलेल्या मोहम्मद युनूस यांच्याकडे बांगलादेशचे हंगामी पंतप्रधानपद सोपवण्यात आले. मोहम्मद युनूस हे नोबेल पुरस्कारविजेते व्यक्ती आहेत. त्यांनी बांगलादेशची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वत्र त्याचे स्वागत करण्यात आले. भारतानेही त्यांचे स्वागत केले. त्यांच्या कार्यकाळात बांगलादेश आणि भारताचे संबंध दृढ होतील असा विश्वास भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला होता मात्र झाले उलटेच.

मोहम्मद युनूस बांगलादेशचे लष्कर आणि मुलतत्ववाद्यांच्या नादी लागून भारतविरोधी कारवाया करू लागले. चीन आणि पाकिस्तानच्या कच्छपी लागून ते भारताला शत्रू मानून भारताच्या खोड्या काढू लागले. आता नेपाळची सूत्रेही राजकारणाबाहेरील व्यक्तीकडे गेली आहेत त्यामुळे नेपाळमध्येही बांगलादेशची पुनरावृत्ती होते की काय, अशी शंका येते. नेपाळमध्ये सत्तेची सूत्रे आता राजकारणाबाहेरच्या व्यक्तीकडे गेली असली तरी राजकीय तरबेज व्यक्तीला देशाबाहेर घालवण्या इतपत तिथे उलथापालथ घडली आहे.(...की घडवली गेली?) राजकीय छक्के-पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहीत नसलेल्या नेपाळच्या या नव्या पंतप्रधानांना तेथील लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून? बांगलादेशात आपण हे पाहिले आहे. नेपाळमधील या अराजकतेमागे बाह्य शक्तीचा हात आहे हे लपून राहिले नाही. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळनंतर कोण? असा प्रश्न सोशल मीडियावर विचारला जात आहे. काही जण याचे उत्तर भारत असे देत आहेत.

श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ प्रमाणे भारतही अराजकतेच्या वाटेवर आहे असे बिंबवण्याचे प्रयत्न चालू आहे. जे श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमध्ये घडले तेच भारतातही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी, अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. जागतिक पटलावर भारताचे वाढते वर्चस्व सहन न होणाऱ्या हितशत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे. मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही, कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत. भारतीय लोकशाही जगातील सुदृढ लोकशाही आहे. कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजत आहे.

भारताची लोकशाही कमकुवत नाही तर ती सुदृढ आहे. भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही. संविधान हा आपल्या लोकशाहीचा पाया आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असूनही आपला देश एकसंध आहे तो केवळ आपल्या संविधानामुळे. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच आपला देश एकसंध आहे. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या शेजारील देशात अनेकदा उठाव, बंड झाले. काही देशात लोकशाही जाऊन हुकुमशाही आली. काही देशावर लष्कराने ताबा मिळवला. आपल्या देशात मात्र अजूनही लोकशाही आहे म्हणजेच लोकांचे राज्य आहे. जोवर या देशात बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान आहे आणि जोवर आपल्या देशात लोकशाही आहे. जोवर देशात लोकशाही आहे तोवर या देशात अराजकता माजणार नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उद्या आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्धापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था अर्धापूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात नामांकित उद्योजक, शाळा व महाविद्यालय तसेच इतर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था अर्धापूर येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

### कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड निलेश हेलोंडे पाटील हे गुरूवार १८ व शुक्रवार १९ सप्टेंबर २०२५ रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. गुरूवार १८ सप्टेंबर रोजी अमरावती येथून दुपारी ३.३० वा. विश्रामगृह माहूर येथे आगमन व तहसिलदार गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत माहूर तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व शासकीय जमिनीवर चारा लागवड यासंबंधी चर्चा. दुपारी ४.४० वा. तहसिलदार माहूर यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट. सायं. ६ वा. किनवटकडे प्रयाण. सायं. ७ वा. विश्रामगृह किनवट येथे आगमन व मुक्काम.

# समाज आजारी पडल्यामुळे सध्याची भयप्रद स्थिती निर्माण झाली –डॉ. सुधीर गव्हाणे

## स्व.गंगाधरराव पापंटवार जीवन गौरव पुरस्कार वितरण संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्याची सामाजिक स्थिती विलक्षण भयप्रद असून समग्र समाज आजारी पडला आहे. हे आजारपण दूर करण्यासाठी स्वतःच समाजाला डॉक्टर व्हावे लागणार असून जात पंथ विरहित एकोप्यानं नांदणारा सुदृढ समाज निर्माण करण्याचे काम प्रत्येकाने करावे लागणार आहे, असे मत माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांनी व्यक्त केले.

स्व. गंगाधरराव पांपटवार जयंती महोत्सव व टीचर्स क्लब रुग्णालय व स्व. गंगाधरराव पांपटवार वैद्यकीय सहकारी संस्थेच्या सातव्या वर्धापनदिनाच्या औचित्याने नांदेड येथील कुसुम सभागृहात जीवन गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी



प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार प्रा.रवींद्र चव्हाण हे होते.

यावेळी पुढे बोलताना गव्हाणे म्हणाले की, देशातील समाज व्यवस्था धार्मिक ध्रुवीकरणाकडे वळत आहे. जात, धर्मवंशावरून मोठ्या प्रमाणावर मने कलुषित केली जात आहेत. पैशाने श्रीमंत असणाऱ्या माणसाला मोठी असामी आहे, म्हणून खोटी प्रतिष्ठा मिळत आहे अशावेळी समाजाने जागृत होऊन जे कर्तुत्वाने कामाने मोठे आहेत, अशांना मोठेपण द्यायला हवे असे सांगून युवकांना काम करण्याची प्रेरणा दिली. असाध्य साध्य करिता सायास या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे आपण एखादी काम हातात घेतल्यावर ते पूर्णत्वास नेण्याच्या दिशेने अतिशय परिश्रमपूर्वक त्या कामात झोकून द्यायला हवे असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी स्व. गंगाधरराव पांपटवार यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन नांदेडचे खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन पांपटवार यांनी केले. टीचर्स क्लब रुग्णालय व सामाजिक कार्याची त्यांनी यावेळी माहिती दिली. स्वागत अध्यक्ष जांभरूनकर यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावर्षीचा आरोग्य कार्यासाठीचा जीवनगौरव पुरस्कार विख्यात न्यूरोसर्जन डॉ.ऋतुराज जाधव, प्रशासकीय पुरस्कार डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, साहित्य क्षेत्रातील पुरस्कार श.ल.नाईक, प्रसार माध्यमाचा पुरस्कार व्हाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, शैक्षणिक पुरस्कार नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव शामल पत्की, उद्योग क्षेत्राचा पुरस्कार पद्मावती डेव्हलपर्सचे भारत रामीनवार, सामाजिक क्षेत्रासाठीचा पुरस्कार पाणी फाउंडेशनचे बाबुराव केंद्रे, कृषी क्षेत्रासाठीचा पुरस्कार विश्वनाथ होळगे तर पद्मावती कला अकॅडमीचे संचालक चंद्रकांत पोतदार आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे अध्यक्ष शेख शिकंदर अली शेख हिम्मत अली यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. डी.बी. जांभरुणकर, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. राम वाघमारे हे होते. सन्मान मूर्तींना देण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन डॉ.विलास ढवळे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जी.एच. पांपटवार यांनी केले तर आभार बालाजी पांपटवार यांनी मानले.

# पीपल्स हायस्कूलचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नांदेड वाघाळा महानगरपालिकेतर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविले आहे.

१७ वर्षांखालील मुलींच्या बुद्धिबळस्पर्धेत कु. श्रद्धा कल्याणकर व कु. श्रावणी कल्याणकर तसेच किकबॉक्सिंग मध्ये १७ वर्षांखालील मुलांमध्ये विविध वजन गटात शुभम गुन्नलवाड, संदीप वायवळे, आदित्य टोकलवाड, रुद्राक्ष आढाव, वीर चिंचोरे, अर्पिता जाधव, अनुष्का सरोदे या विद्यार्थ्यांनी यश संपादन करून विभागीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका श्रीमती उषा कंधारे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, सचिव प्रा. शामलताई पत्की, शालेय समिती अध्यक्ष नौनिहालसिंघ जहागीरदार शाळेचे मुख्याध्यापक नितीन सेलम ेकर, पर्यवेक्षक प्रशांत चौधरी, दुपार स्विफ्ट इन्चार्ज राजश्री भालेराव, योजना बच्चेवार, मनीषा वानेगावकर, मंजुषा वानखेडे, अरविंद काळे, व्ही.आर. चिलवरवार, मनोहर राठोड, शिवराज कदम, पुल्लावार, मनीषा पालेपवाड, अनिता गुंडेवार, श्रद्धा सावले, प्रशांत मारलेवाड, मंगेश चाभरेकर, प्रमोद मंगनाळे, पवन रत्नपारखी, दीपिका यादव यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# ‘एमजीएम’मध्ये एआयसीटीई अटल-फॅकल्टी विकास कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** एआयसीटीई ट्रेनिंग ॲंड लर्निंग अकॅडमी (अटल) आणि एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १३ सप्टेंबर दरम्यान आरोग्य आणि शिक्षण यात बदल घडवणारी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्याच्या ऑनलाईन उद्‌घाटनाप्रसंगी एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, गुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेचे संचालक डॉ मनेष कोकरे, एमजीएमच्या संचालिका डॉ. गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ. एस एल कोडगिरे, डॉ. पी.जी कुलकर्णी, प्रा. डॉ. यु.व्ही. कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना राजुरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि प्रशिक्षणात मार्गदर्शन करणाऱ्या साधनव्यक्तींचा परिचय करून दिला, तर कोर्स समन्वयक डॉ. भाग्यश्री कापरे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाविषयीची माहिती दिली.

महाविद्यालयाच्या संचालिका डॉ.गीता लाठकर म्हणाल्या की, शिक्षण क्षेत्रामध्ये आलेले नवीन बदल आत्मसात करण्यासाठी प्राध्यापकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. सध्या शिक्षण क्षेत्रामध्ये लवचिकता मोठ्या प्रमाणावर येत आहे आणि ती आपण स्वीकारली पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानामुळे मानवाची सृजनशीलता व कार्यक्षमता कमी होणार असल्याची चर्चाही होत असली तरी शिक्षण क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा पर्याय विद्यार्थ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी होऊ शकतो, असे त्या म्हणाल्या.

यावेळी डॉ.यु.व्ही. कुलकर्णी यांनी सामाजिक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख व डॉ. मनेष कोकरे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलतत्त्वे, यंत्र शिक्षण आणि सखोल शिक्षण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमध्ये २०० हून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असल्याची माहिती संयोजकांनी दिली. हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागातील प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिलांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करावे –ना. हेमंत पाटील

## शिवधारा महिला नागरी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवधारा महिला नागरी सहकारी पतसंस्था ही उद्योगांना पाठबळ देण्यासाठी उल्लेखनीय काम करीत असून संस्थेने आगामी काळात जिल्ह्यात ज्या भागात गरज आहे तिथे शाखा सुरू कराव्यात. तसेच महिलांसाठी सण-उत्सवाला लागणाऱ्या छोट्या वस्तू तयार करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करावे असे मत नामदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केल्या. नांदेड हे शैक्षणिक हब असल्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यावर काम केल्यास लघुउद्योग उभारणीस चालना मिळेल असेही ते म्हणाले.

शिवधारा महिला नागरी पतसंस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी जिल्हा उपनिंबधक सिद्धार्थ गायकवाड अध्यक्ष राजश्री पाटील, उपाध्यक्ष किर्ती तगडपल्लेवार, सचिव निता कटकमवार, तज्ञ संचालक धनंजय तांबेकर, सनदी लेखापाल जीवन लाभशेटवार, माजी महापौर मंगला निमकर यांच्यासह सर्वश्री संचालक अरुणा पुंड, रेवती रगटे, प्रा.अनुराधा बोरगेमवार, प्रतिक्षा पतंगे, वैष्णवी प्रसाद पाटील, विजया बोरसे, रंजना चव्हाण, रेखा जोंधळे, कलंबर कारखान्याचे अध्यक्ष सदाशिव पुंड, गोदावरी अर्बनचे सचिव ॲड. रविंद्र रगटे, संचालक प्रा.सुरेश कटकमवार, वर्षा देशमुख यांच्यासह संख्येन सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, ग्राहकांना केवळ आर्थिक सक्षम करून चालणार नाही तर त्यांना आर्थिक साक्षर करणे आवश्यक आहे. महिलांनी आपली ताकद सकारात्मक वापरल्यास त्यांना प्रगतीपासून कोणीही रोखू शकत नाही. महिलांचे जीवनमान सुधारल्यास कुटुंब आर्थिक संपन्न होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उत्कृष्ट ठेवीदार संभाजी जाधव, शोभा मोरे, वैष्णवी गोळेगावकर, उत्कृष्ट कर्जदार रमाकांत लवांडे, महमद चांद पाशा, दिलीप कल्याणकर, उत्कृष्ट संचालिका रेवती रगटे, विजया बोरसे, उत्कृष्ट दैनिक आवर्ती ठेव प्रतिनिधी म्हणून शिवशंकर अडकिने, प्रवीण धाकपाडे तर उत्कृष्ट शाखा अधिकारी गजानन बंडे, कनिष्ठ अधिकारी अक्षय ढवळे, लक्ष्मण कदम यावेळी संभाजी जाधव, शोभा मोरे, रमाकांत लवांडे यांसारख्या सभासदांनी संस्थेच्या सेवांचा अनुभव मांडून शिवधाराच्या योजनांची प्रशंसा केली.

तज्ञ संचालक धनंजय तांबेकर यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून आगामी योजनांची माहिती दिली. सनदी लेखापाल जीवन लाभशेटवार यांनी लेखा परीक्षण अहवाल सादर करत शिवधाराची प्रगती वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# पर्यावरणाचा असमतोल रोखण्यासाठी नव्याने संशोधन व्हावे –कुलगुरू डॉ.मनोहर चासकर

## नेसुबो महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक स्तरावर पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला असून त्याचे दूरगामी परिणाम मानवी जीवनावर होत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नव्याने संशोधन होणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील आयोजित एक दिवसीय आंतरविद्या शाखीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनाप्रसंगी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वअभिनव भारत शिक्षण संस्था संचलित, नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद पर्यावरण व अर्थशास्त्र: शाश्वत विकासाचा दृष्टिकोन या विषयावर आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष कैलासचंद काला तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदूषण मंडळ मुंबईचे सहाय्यक सचिव डॉ. नंदकुमार गुरव, शिवमोगा विद्यापीठ कर्नाटक येथील डॉ.जे. नारायणा, माजी कुलगुरू डॉ. एन.व्ही.कल्याणकर सहसचिव धनंजय जोशी, प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, संस्थेचे सदस्य माधव पांडे, माजी प्राचार्य डॉ. सुधीर



शिवणीकर डॉ.पी.पी. लोणारकर, डॉ. जयभारत मंगेशकर, बीजभाषक जागतिक बॅंकचे सदस्य डॉ. अजय देशपांडे, उपप्रादेशिक अधिकारी सौ. कल्याणी कुलकर्णी, अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ.एल.एच. पाटील, उपप्राचार्य डॉ.कल्पना कदम, डॉ.अर्चना भवानकर अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.के.जे.कांबळे, सहसंयोजक डॉ. राजेश, उंबरकर, डॉ.जान्हवी शिउरकर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ.मनोहर चासकर म्हणाले की, आजच्या जागतिक परिस्थितीत पर्यावरण संवर्धन आणि मानवी प्रगती यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हे मानवी जीवनाला घातक आहे. जैवविविधतेवरील संकट वाढत चालले आहे. दुसरीकडे, मानव विकासाची गती थांबवणे अशक्य आहे, याकरिता शाश्वत विकासाची संकल्पना मार्गदर्शक ठरते. बीज भाषक डॉ. अजय देशपांडे म्हणाले की, पर्यावरणाचे संवर्धन करणे म्हणजे देशाचा शाश्वत विकास होय. पर्यायाने देशाचा आर्थिक विकास साध्य होऊन कल्याणकारी अर्थव्यवस्था निर्माण होईल असे ते म्हणाले. प्रास्ताविक परिषदेचे समन्वयक डॉ.आनंद अष्टुरकर यांनी केले. या परिषदेत एकूण ३०५ शोधनिबंध वाचक सहभागी झाले होते. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनीष देशपांडे यांनी तर आभार डॉ. परविंदरकौर महाजन यांनी मानले.

# मंदिर चोरी व घरफोडीतील दोन चोरटे एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मंदिर व घरफोडी करणारे अट्टल दोन चोरटे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केले आहेत. त्यांच्याकडून नगदी ३२ हजार रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत.

दि. १५ सप्टेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना नांदेड शहरात माली गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना गुप्त माहिती मिळाली की, नांदेड कोर्टाचे मागील रोडवर मोनार्क कॅन्सर हॉस्पीटलच्या बोर्डाजवळ दोन इसम चोरीचे पैसे वाटून घेत आहेत, अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी गेले असता तेथे संशयीत दोन इसम पोलिसांना पाहून पळून जात असताना त्यांचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी सुरज रामकिशन घेणे (वय २४, रा.लक्ष्मीनगर, मालटेकडी रोड नांदेड.ह.मु. नागाराम झोपडपट्टी निजामाबाद) आणि अक्षय ऊर्फ भोप्या सुरेश कांबळे (वय २३, रा. आंबेडकर नगर, जनता कॉलनी नांदेड. लक्ष्मीनगर, मालटेकडी रोड नांदेड) असे असल्याचे सांगितले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता दोघांचे ताब्यात नगदी ३२ हजार रूपये जप्त केले. त्यांची विचारपुस केली असता सदरचे पैसे हे अंदाजे मागील दोन महिन्यापूर्वी संगमेश्वर मंदीर भाग्यनगर मंदीरातून व लहुजीनगर बारड येथील एका घरातुन चोरी केल्याची कबुली दिली आहे. दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन मुद्देमालासह पुढील कायदेशीर कारवाई कामी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# विश्वनाथ गोणशेटवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बडूर ता. बिलोली येथील तंटामुक्तीचे माजी उपाध्यक्ष विश्वनाथ गोविंदराव गोणशेटवाड यांचे दि. १७ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.



विश्वनाथ गोणशेटवाड यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि. १८ सप्टेंबर रोजी बडूर येथे दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बेलदार समाजाचे कार्यकर्ते योगेश गोणशेटवाड यांचे ते वडील होत गेले.

# दत्तात्रय कदम यांचा पदोन्नतीबद्दल तालुका प्रशासनाच्यावतीने सन्मान



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम यांची यवतमाळ जिल्ह्यातील महागाव पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी (गट-अ) या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल तालुका प्रशासनाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी अर्धापूरचे गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड, विस्तार अधिकारी पांडुरंग गर्जे, सुभाष कल्याणकर, रमाकांत नावंदे, सूर्यभान सूर्यवंशी, श्याम कावळे, देवेंद्र देशपांडे, महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा शीतल कांबळे, पवन मस्के, ग्रामपंचायत अधिकारी शिवकुमार देशमुख, खंडेराव मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सेवाकाळात दत्तात्रय कदम यांनी तालुक्यातील पदाधिकारी व अधिकारी यांच्यात साधलेला समन्वय पाहता ग्रामीण भागातील तळागाळातील शेतकरी व मजूर कुटुंबांना न्याय देवून मोलाचे सहकार्य केल्याचे मत शिवकुमार देशमुख यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी राम ठाकूर, नरसिंग चेरकेवाड, सारथी रोशन, अवधूत वाघमोडे, शिवशंकर दहिभाते यांसह तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दैनंदिन साफसफाई होत नसल्याने संतप्त महिलांनी क्षेत्रीय कार्यालया येथे अधिकाऱ्यांना घेराव

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक २० मधील शंकरनगर भागातील विघादान कोचींग क्लासेस व परिसरातील कचरा दैनंदिन साफसफाई होत नसल्याने सिडको महिला ब्लॉक महिला अध्यक्षा ज्योती कदम यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवीका डॉ.करूणा जमदाडे व संतप्त महिलांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे जाऊन आम्ही मागे पुरी करो घोषणा दिल्या. यावेळी वरीष्ठ लिपीक मिना अडबलवार यांनी निवेदन स्विकारले.

गेल्या अनेक दिवसांपासून नागरी समस्या मोठ्या तक्रारी होत असल्याने या संदर्भात



सिडको ब्लॉक महिला अध्यक्ष ज्योतीताई संदिप कदम यांच्या नेतृत्वात सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे निवेदन देण्यात आले, यात शंकरनगर भागात दैनंदिन साफसफाई झाली नसल्याने व नाल्यातील कचरा संततधार पावसामुळे अनेकांच्या निवासस्थानी नाल्याचे पाणी शिरल्याने जिवनाश्यक वस्तू नुकसान झाले, दैनंदिन साफ सफाई होत नाही, परिसरात मोठ्या प्रमणात कचराचे ढिगारे पसरल्याने नागरीकांच्या आरोग्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता असून डेंग्यू ताप शिरकाव परिसरात झाला असून तात्काळ नाले सफाई करावी यासह मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी माजी नगरसेवक करुणा जमदाडे, ब्लॉक कमिटी परभणी बापुसाहेब पाटील, युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रेसनजित वाघमारे, प्रा. मधुकर गायकवाड गौरव दरबस्तवार, उपशहर प्रमुख सिडको कलावती बाई चव्हाण, उषा मोरे, अर्चना गव्हाणे, लक्ष्मीबाई साखरे, रेखा काशीवार, सीमा गुंडाळे, मेरा पंदिरवार, नागिनबाई मिराशी, बाळू आढाव, ज्ञानेश्वर बंडेवार, ठाकूर बाई, योगेश स्वामी, रायगावकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# ‘यशवंत’मध्ये उद्योगातील कौशल्याचे मार्गदर्शन संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग व सीआयसी यांच्या वतीने दि.१५ व १६ सप्टेंबर रोजी पीएम उषा योजनेअंतर्गत आयोजित दोन दिवसीय विश्लेषणात्मक उपकरणांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.एम.ए. बशीर होते तर तज्ञ मार्गदर्शक ठाणे, मुंबई येथील वाशीकर फार्मा कंपनीचे संचालक तथा यशवंत महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ.सुधीर कुंभार होते.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलनाणे झाले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ. सुभाष बी.जुन्ने यांनी दोन दिवसीय कार्यशाळेची रूपरेषा व उद्देशाबद्दल विस्तृत प्रस्तावना केली.डॉ.एम. ए.बसीर यांनी विभागातील विविध उपक्रमाविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांनी, रसायनशास्त्र विभाग व कार्यशाळा आयोजक यांचे अभिनंदन केले आणि विद्यार्थ्यांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घेऊन भविष्यामध्ये संशोधन क्षेत्रात तसेच मोठमोठ्या औद्योगिक कंपनीमध्ये या कार्यशाळेतील प्रशिक्षणाचा उपयोग करून आपले व आपल्या महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे, असा संदेश दिला तसेच अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रात उत्तम संधी मिळतील, असा आशावाद देखील व्यक्त केला.

याप्रसंगी विचारपीठावर रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.एम.ए.बसीर, समन्वयक डॉ. सुभाष जुन्ने, सीआयसी समन्वयक डॉ.एस.पी.वर्ताळे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ.विजय भोसले यांनी केले तसेच आभार देखील मानले.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# नवरात्रीत करा घरच्या घरी मेकअप

**यंदा ब्युटी पार्लरमध्ये जाऊन खास नवरात्रीसाठी मेकअप आणि मनाप्रमाणे लुक करून घेणं शक्य नाही. पण, काळजी करण्याची आवश्यकता नाही. काही ठरावीक गोष्टी लक्षात ठेवल्यास घरच्या घरी उत्तम मेकअप करता येऊ शकेल. तुम्हाला बेसिक मेकअप टिप्स माहीत असतील तर घरबसल्या स्वतःचा मेकअप नक्कीच करू शकता.**

## करा सुरुवात

आऊटफिटवर साजेसा मेकअप करायला सर्वांनाच आवडतो. मेकअप करण्याआधी त्याचे टप्पे जाणून घेणं गरजेचं आहे. सर्वात आधी चेहरा स्वच्छ पुसा आणि मॉयश्चरायजर लावा. त्यानंतर प्रायमर लावा. प्रायमर लावल्यानं मेकअप व्यवस्थितपणे सेट होण्यास मदत होते. नवरात्रीत गडद मेकअप करण्यावर भर दिला जातो. तुमच्या पेहरावाला शोभून दिसेल अशा शेड्सचे शिमर, हायलायटर, ब्लश वापरावेत. गडद मेकअप करायचा असल्यास चंदेरी, सोनेरी, ब्राँझ रंगाच्या शिमर्सची मदत घ्या. चेहऱ्यावर असणारे डाग लपवण्यासाठी बाजारात खास तीन ते चार रंगाचे करेक्टर्स मिळतात ते विकत घ्या. सणावारानुसार मेकअप कसा करायला हवा याबद्दल असंख्य व्हिडीओज युट्यूबवर उपलब्ध आहेत.

## हेअरस्टाइलचे पर्याय

हेयरस्टाइल नेहमी मेकअपआधी करावी. ओढणी घेण्याच्या पद्धतीवरून केशरचना करा. जर ओढणी डोक्यावर घेत असाल तर साधा बन बांधून ऑक्सिडाइज्ड हेअर ॲक्सेसरीजनं सजवा. ओढणी एका बाजूला घेत असाल तर फिश टेल पोनी आणि ब्रेडस बांधण्याचा पर्याय आहे. गरबा आऊटफिटवर हेअरस्टाइल कशी करावी याबद्दल अनेक व्हिडीओज युट्यूबवर उपलब्ध आहेत. हेअरस्टाइल आणखी खुलून दिसण्यासाठी मांगटिकाची (बिंदी) मदत घ्या.

## महत्त्वाचा टप्पा

नवरात्रीमध्ये स्मोकी आइज मेकअपची प्रचंड क्रेझ असते. डोळ्यांचा मेकअप शक्यतो चेहऱ्याच्या आधी करावा. त्यामुळे आयशॅडोचे रंग चेहऱ्यावर पडून मेकअप खराब होण्याची शक्यता कमी होते. तुम्ही जर लेन्स वापरत असाल तर ते मेकअप करण्याच्या आधी लावावेत. डोळ्यांचा मेकअप करताना डोळ्यांखाली असणारी काळी वर्तुळं कलर करेक्टर किंवा कन्सिलरनं लपवा. हायलायटर, फाऊंडेशन आणि कन्सिलर विकत घेताना तुमच्या रंगाच्या एक शेड सौम्य घ्यावं. डोळ्यांच्या मेकअपमध्ये आयब्रो पेन्सिल आणि मस्कारा लावायला विसरू नका. जेल बेस असणाऱ्या लिपस्टिक्स ऐवजी जलरोधक आणि मॅट बेस किंवा लिक्विड मॅट लिपस्टिकची निवड करा.



## टिप्स

- सणासुदीला मेकअप करताना कायम जलरोधक प्रॉडक्ट्सची निवड करा.
- तेलकट त्वचा असणाऱ्यांनी मॅट तर कोरडी त्वचा असणाऱ्यांनी मॉयश्चरायजर किंवा क्रीम बेस फाऊंडेशनचा वापर करावा.
- मान आणि चेहऱ्याचा टोन समान दिसेल या हिशोबानं मेकअप करा.
- नवरात्रीच्या मेकअपमध्ये टिकलीला महत्त्व असतं. मोठ्या आकाराच्या टिकल्यांना प्राधान्य देऊ शकता.
- तुमचा मेकअप किट आणि ब्रशेस इतरांसोबत शेअर करू नका. त्यानं जंतुसंसर्ग होऊ शकतो.
- मेकअप टिकून राहण्यासाठी मेकअप सेट करणारा स्प्रे वापरावा.
- नवरात्रीत चेहऱ्याला सलग नऊ दिवस गडद मेकअप लावल्यामुळे त्याचे परिणाम होऊ शकतात. निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी चेहऱ्यावर नियमित मॉयश्चरायजर आणि इसेसेन्शियल ऑइल्स लावा.



# ९ दिवस नटण्यामुरडण्याचे!

**येत्या दोन-तीन दिवसांतच नवरात्राला सुरवात होईल. गरब्याचा नाद घुमेल. दागिने, घागरे यांची झगमग दिसेल. या नऊ दिवसांत नटण्यामुरडण्याची हौस सगळ्या मुली भागवून घेतात. या नऊ दिवसांत इन फॅशन अशा कोणत्या गोष्टी असतील, त्याबद्दल...**

## बहुढंगी दांडिया

- आपल्या कपड्यांप्रमाणे आणि दागिन्यांप्रमाणे दांडियाही फॅशनेबल हव्यात. त्या तशा नसतील तर काही गंमत नाही. म्हणूनच बाजारात अनेक प्रकारच्या दांडिया आल्या आहेत.
- डिस्को दांडिया : डीजेच्या तालावर नाचण्यासाठी हल्ली निऑन स्टिकचा वापर करतात. त्यांनाच थोडं मजबूत करून एलईडी स्टिक्स दांडिया बाजारात आल्या आहेत.
- झुमकेवाल्या दांडिया : झुमके ही मुलींची आवडती गोष्ट आहेच. अगदी कानातल्यांपासून बांगड्यांपर्यंत त्यांचा वापर होतो आहे. त्यामुळेच आता आल्या आहेत, खास रंगीबेरंगी आणि वर्कवाले झुमके असलेल्या दांडिया.
- राजा राणी दांडिया : राजस्थानच्या सहलीला गेल्यावर तिथल्या प्रसिद्ध बाहुल्या सगळेच आणतात. त्याच बाहुल्या मध्यभागी लावून दांडियाला अधिक आकर्षक बनवलं जातं.
- बांधणी दांडिया : पारंपरिक दांडियालाच बांधणीचा कपडा लावून या तयार होतात. त्याला खाली घुंगरूही लावलेले असतात. याचं वैशिष्ट्यं म्हणजे यातली भन्नाट रंगसंगती.
- ट्विस्ट दांडिया : स्टीलच्या दांडियामध्ये एक गोलाकार चक्र असते. त्यामुळे दोन्ही बाजूने तुम्ही दांडिया खेळू शकता.



## दसनूर कपडा

सण कोणताही असो, आपल्याला नवे कपडे खरेदी करण्यासाठी एक निमित्त हवं असतं. नवरात्र म्हणजे तर अगदी रंगांचाच सण. नवरात्रासाठी नेहमीची घागरा चोली किंवा चणिया चोली तर असतेच पण त्याशिवायही अनेक प्रकार बाजारात आलेले आहेत.

- रेडीमेड चोली : यंदा बाजारात कच्छी एम्ब्रॉयडरीच्या रेडिमेड चोलीज आलेल्या आहेत. या तुम्ही साडी आणि घागरा दोन्हीवर वापरू शकता. त्यात अतिशय सुंदर रंग आणि नक्षीही उपलब्ध आहेत.
- जॅकेट : पांढऱ्या कुर्त्यावर रंगीबेरंगी जॅकेट घालून तुम्ही हटके लूक आणू शकता. त्यावर वेगवेगळ्या पद्धतीची डिझाइन केलेली असते. ही जॅकेट लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या अशा उठावदार रंगांमध्ये उपलब्ध आहेत. नवरात्रानंतरही तुम्ही ही जॅकेट स्कर्ट किंवा जीन्सवर वापरू शकता.
- क्रॉप टॉप : घागऱ्यावर किंवा डिझायनर स्कर्टवर असा क्रॉप टॉप स्टाइलचा ब्लाऊज घालता येईल. तसंच यासोबत धोती पँट आणि कच्छी ज्वेलरी घालून मस्त हटके लुकही मिळवता येईल.
- धोतीपँट : मुलींमध्ये याची खूप क्रेझ आहे. या दिसायला अतिशय सुंदर आणि हटके असतात. यावर कमरपट्टा आणि हाफ कुर्ता, जॅकेट घालून एक वेगळा आऊटफिटही तयार होईल.
- रंगीत ओढण्या : एम्ब्रॉयडरी केलेल्या भरजरी ओढण्या या काळात अतिशय लोकप्रिय होतात. यंदाही यात अनेक प्रकारच्या ओढण्या आल्या आहेत. हातमागावर या ओढण्या बनतात. त्यावर अतिशय बारीक आणि नाजूक काम केलेलं असतं. त्याची रंगसंगती तर केवळ अप्रतिम असते. या तुम्ही कशावरही वापरू शकता. घागरा-चोली, पंजाबी, जीन्स, स्कर्ट अशा कोणत्याही ड्रेसवर हटके ड्रेप करून घेतलेल्या या ओढण्या उठावदार दिसतात.
- कुर्ता : कुर्ता हा प्रकार काही मुलांची मक्तेदारी नाही. मुलींनाही तो हल्ली विशेष भावताना दिसतोय. त्यातही कॉटन बांधणी, हाफ कुर्ता, शॉर्ट कुर्ता, लाँग कुर्ता, अनारकली कुर्ता अशा अनेक प्रकारातले कुर्ते सध्या बाजारात आहेत. राजस्थानी झलक असलेले कुर्ते घेतलेत तर आणखीच उत्तम.
- मोजडी : राजस्थानी एम्ब्रॉयडरीच्या मोजडीजना नवरात्रात खूप मागणी असतेच. त्यामुळे यात अनेक प्रकार बाजारात येत असतात. राजस्थानी स्टाइलच्या या मोजडीज तुम्ही नंतरही वापरू शकता.

## दागिन्यांची रेलचेल

- नवरात्रीच्या दिवसांत जिकडेतिकडे दागिन्यांचा लखलखाट दिसून येतो. कच्छी, राबेरी, काच, काचेचे मणी, मेटल, ऑक्साइड, कापड, लाकूड अशा अनेक प्रकारांचे दागिने नवरात्रीत घातले जातात.
- मोतीवाले झुमके : सध्या जिकडेतिकडे झुमक्यांची क्रेझ आहे. त्यातही मोती लावलेले झुमके तर मुलींमध्ये भलतेच लोकप्रिय आहेत. हे झुमके घागरा-चोलीवर विशेष उठून दिसतात.
- गोंड्याच्या बांगड्या : राजस्थानी स्टाइलच्या बांगड्याना शोभेल असे रंगीत गोंडे लावल्यावर या बांगड्या तयार होतात. यात लाखेच्या बांगड्यांची विशेष क्रेझ आहे. मोठ्या आकाराची कडीही या दिवसांत छान दिसतात.
- कच्छी दागिने : कवडी आणि वेगवेगळ्या कच्छी एम्ब्रॉयडरीने कापडावर केलेल्या दागिन्यांना कच्छी दागिने म्हणतात. कमर बंध, बाजूबंद, मांगटिका, मंगल हार अशा पद्धतीतले हे दागिने सध्या खूप लोकप्रिय आहेत. गरब्यासाठी तर ते अगदी उठून दिसतात.
- कापडी कडे : पंज्याला उठावदार दिसतील असे हे कापडी कडे दिसायला खूप आकर्षक आहेत. कच्छी दागिने, राबेरी दागिने, काचेच्या मण्यांचे दागिने, या सगळ्या प्रकारात हे दागिने उपलब्ध आहेत. काचा, विविध एम्ब्रॉयडरीचा वापर करून हे कडे बनवले जातात.
- कमरपट्टा : गरब्याला कुठलेही हटके कपडे ट्राय करताना त्यावर कमरपट्टा खूप शोभून दिसतो. यंदा मार्केटमध्ये वेगवेगळ्या पद्धतीचे कमरपट्टे आले आहेत. त्यावर सुंदर आकर्षक डिझाइन्स असतात. पोपट, मोर अशा पक्ष्यांचा वापर केलेले झल्ला पद्धतीचे कमरपट्टे आले आहेत.
- साडी पिन : घागरा चोळी किंवा भरजरी साडीला व्यवस्थित चापूनचोपून बसवण्यासाठी त्यावर शोभेल अशी साडी पिन हवीच. त्यासाठीच बाजारात भरजरी साडी पिना आल्या आहेत.

## काळजी घ्या स्वतःची

नवरात्रीचे हे नऊ दिवस नेमकं काय काय करावं, कसं कसं सजावं याची एक यादीच तुम्ही बनवली असेल ना मैत्रिणींनो? सध्या अनेक स्पा सेंटर्स आणि ब्युटी पार्लरमध्ये खास गरब्यानिमित्त ऑफर्स चालू आहेत. हेअर स्पा, बॉडी स्पा, फेशिअल्स, पेडिक्युअर, मॅनीक्युअर, बॉडी रॅप, फ्रुट रॅप अशा अनेक पद्धतीच्या स्पा ट्रीटमेंट मुली करून घेत असतात. अर्बन स्पा, डेस्टीनेशन स्पा, मेडिकल स्पा, हॉट स्पा, आयुर्वेदिक स्पा, क्रुझ स्पा, मिनरल स्पा, इको स्पा हे यातील आणखी नवे प्रकार म्हणता येतील. सध्या सगळ्यात जास्त मागणी आहे ती आयुर्वेदिक स्पा आणि मेडीकल स्पा या पद्धतींना. यात शक्यतो केमिकल्सचा वापर टाळून ट्रीटमेंट केली जाते. घरच्या घरीसुद्धा ऑलिव्ह ऑइल, मध, केळं, काकडी, हळद, भोपळा, नारळ, फळं याचा उपयोग करून स्पा ट्रीटमेंट करता येते. या प्रकारातील स्पा ट्रीटमेंट साधारण ५०० रुपयापासून सुरू होतात. पण या ट्रीटमेंट करून घेताना काही नियम पाळायला हवेत.

- मद्यपान करून किंवा धूम्रपान करून मग स्पा घेऊ नका.
- तुम्हाला हृदयविकाराचा त्रास असेल, उच्च रक्तदाब किंवा कमी रक्तदाबाचा त्रास असेल, तुम्ही मधुमेहाचे रुग्ण असाल तर स्पा ट्रीटमेंट घ्यायच्या आधी डॉक्टरांची परवानगी घ्या.
- स्पा ट्रीटमेंट घ्यायला जाताना पायाला सोयीस्कर आणि आरामदायी अशा चपलेची निवड करा. ज्यामुळे कुठलंही फंगस इन्फेक्शन होणार नाही.
- तनामनाला ताजंतवानं करण्यासाठी स्पा ट्रीटमेंट केली जाते. त्यामुळे ती करण्यासाठी जाताना सगळे मानसिक ताण-तणाव विसरून जा.
- स्पा करताना मोबाइलवर फेसबुक चेक करणं, फोटो काढत बसणं किंवा सेल्फी काढू नका. उगाचच कँडी क्रशसारखे खेळही खेळत बसू नका. यामुळे तुमचं लक्ष उगाचच दुसरीकडे जातं. शक्यतो फोन सायलेंटवर करून ठेवा किंवा चक्क लॉकरमध्ये ठेवा. स्पा थेरपी एंजॉय करा.

# नवरात्रोत्सवासाठी ३ सुंदर साड्यांचा पर्याय

### वजनाने हलक्या अन् स्टाइलमध्येही जबरदस्त

**परंपरागत पद्धतीने पूजा-अर्चना करून नवरात्रोत्सवास प्रारंभ केला जातो. उत्सवांदरम्यान महिलांना नटण्या-सजण्याची हौस पूर्ण करण्यासाठी आयती संधीच मिळते. पण यंदा हा उत्सव साजरा करताना भरजरी, वजनदार साड्यांऐवजी हलक्या आणि स्टायलिश साड्या नेसून स्वतःला आकर्षक लुक द्या.**

- ऑर्गेन्झा सिल्क : सध्या महिलावर्गामध्ये प्युअर सिल्कसह ऑर्गेन्झा सिल्कचीही क्रेझ पाहायला मिळत आहे. बॉलिवूडमधील बहुतांश अभिनेत्री या ऑर्गेन्झा सिल्कच्या साड्यांपासून सूट ते लेहंग्यापर्यंत असे विविध प्रकारचे पोषाख परिधान करताना दिसतात. वजनाने हलके असण्यासोबतच हे फॅब्रिक मऊ आणि चमकदार देखील असते. या पॅटर्नची साडी नेसून तुम्ही सहजरित्या कॅरी करू शकता.
- शिफॉनची साडी : चमकदार रंगाच्या शिफॉन साडीमुळे मोहक लुक मिळतोच, तसंच ही साडी नेसल्यानंतर कॅरी करणं देखील अतिशय सोयीस्कर ठरते. वजनदार एम्ब्रॉयडरीऐवजी बॉर्डर किंवा सीक्वंस वर्क असणाऱ्या शिफॉनच्या साडीची तुम्ही निवड करू शकता. हटके लुक हवा असल्यास त्यावर स्टायलिश ब्लाउज मॅच करू पाहा.
- कॉटन साडी : बहुतांश महिलांना कॉटन पॅटर्नची साडी नेसणं प्रचंड आवडते. अतिशय हलकी साडी नेसायची असल्यास कॉटन पॅटर्न परफेक्ट निवड ठरू शकते. स्टायलिश लुकसाठी तुम्ही बोट नेकलाइन किंवा स्लीव्हलेस ब्लाउज शिवून घेऊ शकता. अशा पद्धतीने तुम्हाला हटके आणि आकर्षक लुक मिळेल. या पॅटर्नमध्ये फिकट रंगाची साडी नेसल्यासही तुम्हाला मोहक लुक मिळेल, यात काही शंका नाही.

# दुर्गापूजाला मिळवा तुकतुकीत त्वचा



**नवरात्री आणि दुर्गापूजेचे उत्साही दिवस जसजसे जवळ येतात, तसतसा वातावरणातही एक उत्साह, आनंद आणि एकजुटीची भावना जाणवू लागते. हे आनंदाचे प्रसंग त्यांच्यासोबत दिव्यांच्या झगमगाटात रात्री उशिरापर्यंत खेळले जाणारे नृत्य आणि भव्य मेजवानीही घेऊन येतात. या सणांसाठी सुंदर दिसण्यावर बायकांचा सर्वाधिक भर असतो. मात्र, या सणांच्या काळातच त्वचेला अनेकदा वातावरणातील बदल, भरपूर मेकअप आणि बदलत्या हवामानाचा सामना करावा लागतो. या सणासुदीच्या दिवसांमध्ये तुमची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी त्वचेची नियमित काळजी घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमच्या त्वचेचे योग्य संरक्षण आणि पोषण केल्याने तुमच्या चेहऱ्यावरील ग्लो हा कृत्रिम नाही, तर नैसर्गिक असतो. मग हा उत्सव कितीही काळ सुरू राहिला, तरीही तुम्ही ताजेतवाने दिसता. काही प्रभावी स्किनकेअर टिप्स तुम्हाला सणासुदीच्या दिवसांत निश्चितच उपयोगाच्या ठरू शकतील...**

- क्लिंझिंगची कमाल : सणासुदीच्या दिवसांत अनेकदा त्वचेला धूळ, घाम आणि मेकअपचा सातत्याने सामना करावा लागतो. यामुळे त्वचेची छिद्र बंद होतात. हे टाळण्यासाठी आणि त्वचा स्वच्छ करून ताजीतवानी ठेवण्यासाठी ती कोरडी पडणार नाही, अशा क्लिन्सरने हळूवार तुमचा चेहरा दिवसातून दोनदा स्वच्छ करा.



- हायड्रेशनला प्राधान्य : त्वचा निरोगी राखण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्वचेतील, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून त्वचा ओलसर ठेवण्यासाठी दिवसातून कमीतकमी ८ ग्लास पाणी पिण्याचे उद्दिष्ट ठेवा. योग्य हायड्रेशनमुळे तुमच्या त्वचेची लवचिकता आणि तुकतुकीतपणा अधिक सुधारू शकतो. शारीरात जास्ती जास्त पाणी पिण्याचा प्रयत्न करा.
- सनस्क्रीन क्रीमचा वापर : सणांदरम्यान होणाऱ्या दिव्यांच्या झगमगाटामुळे अतिनील किरणे त्वचेला हानी पोहोचवू शकतात. तुमच्या त्वचेचे संरक्षण करण्यासाठी, दररोज SPF 30 किंवा त्याहून अधिक वरच्या दर्जाचे ब्रॉड-स्पेक्ट्रम सनस्क्रीन लावा, मग ऋतू कोणताही असो. हानिकारक अतिनील किरणांपासून त्वचेचे संरक्षण करण्यासाठी घराबाहेर असल्यास दर दोन तासांनी पुन्हा क्रीम लावा.
- मॉइश्चरायझरचा वापर : सणासुदीत तुमची त्वचा तेलकट किंवा कोरडी वाटत असली, तरी ती ओलसर ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे याचा विचार करून मॉइश्चरायझरचा वापर करा. त्वचेला आवश्यक हायड्रेशन देताना, त्वचेची छिद्रे बंद होणार नाहीत, असा हलका मॉइश्चरायझर निवडा. हायलुरोनिक ॲसिड आणि ग्लिसरीन यांसारखे घटक पहा, जे त्वचेवर कोणतेही दुसरे परिणाम होऊ न देता, त्वचा ओलसर ठेवण्यास मदत करतील.
- चांगल्या त्वचेसाठी योग्य बॉडी लोशन : चेहऱ्यासोबतच तुमच्या शरीराला विसरू नका. जर तुम्ही नाचत असाल आणि घाम येत असेल, तर तुमची त्वचा मऊ आणि हायड्रेटेड ठेवण्यासाठी आंघोळीनंतर तुम्हाला सूट होणारे बॉडी लोशन आवर्जून लावा. अतिरिक्त हायड्रेशनसाठी तुम्ही शिया बटर किंवा खोबरेल तेल याचा निश्चितच विचार करू शकता. यामुळे त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते.
- वॉटरप्रूफ मेकअप : सणासुदीच्या धामधुमीत नेहमीच वॉटरप्रूफ मेकअप निवडा. वॉटरप्रूफ प्राइमर, फाउंडेशन आणि कन्सीलरसह सुरुवात करा. त्यानंतर, स्मज-प्रूफ आयलाइनर आणि मस्करा. मग दिवसभर तुमचा लूक असाच अप टू डेट ठेवण्यासाठी सर्वात शेवटी सेटिंग स्प्रेचा वापर करा.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी छ. संभाजीनगर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – मराठवाड्याची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी उद्योग आणि त्यातून रोजगार निर्मिती, कृषि, पायाभूत सुविधा विकास अशा सर्व क्षेत्रात अथकपणे काम करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रमात दिली.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानात मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृतीस्तंभ येथे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. पोलीस दलातर्फे शस्त्र सलामी, मानवंदनेनंतर ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, प्रशांत बंब, प्रदीप जैस्वाल, विलास भुमरे, आमदार श्रीमती संजना जाधव, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस आयुक्त प्रविण पवार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी मोठा लढा उभारला, यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवीनारायण रेड्डी, देवीसिंगजी चव्हाण, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे, काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्धन होरटीकर गुरुजी, सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर अशा अनेक जणांनी स्वातंत्र्यसंग्रामात पुढाकार घेऊन काम केले. त्यांच्यासोबत असंख्य लोकांनी रझाकारांच्या जुलूमातून मराठवाड्याला मुक्त केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर जवळपास १३ महिने हा रणसंग्राम चालला आणि त्यातून मराठवाड्याला मुक्ती मिळाली आणि म्हणूनच हा दिवस केवळ मराठवाड्याच्या मुक्तीचा दिवस नाही, तर एकसंघ भारत निर्मितीचा दिवस म्हणून देखील या दिवसाकडे आपण पाहू शकतो. या सर्व लोकांचा आदर ठेवत मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करणे आपले कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# कांदा निर्यात अनुदान दुप्पट करण्याची केंद्र सरकारकडे मागणी

## ■ पणन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती



**मुंबई** –बाजारात कांद्याचे दर टिकून राहावे व त्याचा फायदा राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना व्हावा यासाठी केंद्र सरकारने कांदा निर्यातीला प्रोत्साहन देऊन निर्यात अनुदान दुप्पट करावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे केली असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

कांद्याच्या दरासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी मंत्रालयात पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार सर्वश्री रमेश बोरनारे, विठ्ठल लंघे, पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील, पणन विभागाचे सह सचिव विजय लहाने यांच्यासह नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री जयकुमार रावल म्हणाले, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे. ५५ लाख मेट्रिक टन कांद्याचे उत्पादन वाढले असले तरी वर्तमान स्थिती लक्षात घेता कांदा निर्यातीला प्रोत्साहन देणे व इतर उपाययोजना करणे आवश्यक आहेत. त्यासाठी केंद्र सरकारने कांदा निर्यात अनुदान दुप्पट करावे, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. त्याला केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे विविध देशात कांदा निर्यात होऊन राज्यातील कांद्याचे दर स्थिर राहण्यास मदत होईल.

कांदा बाजारात अफवा पसरवून वेळोवेळी कांद्याचे दर पाडले जातात. त्याचा फायदा ठराविक व्यापाऱ्यांना होतो. यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणात दक्षता समिती कार्यान्वित करण्यात आल्या असून त्यांना कार्यकक्षा ठरवून दिली आहे. त्यामुळे कांद्याची साठेबाजी, नफखोरी अशा विविध गोष्टींवर लक्ष राहणार आहे, अशी माहिती मंत्री श्री.रावल यांनी दिली.

## जाहीर प्रगटन
## प्रतिभा निकेतन महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था म. नांदेड, ता. जि. नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करिता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत असून, उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी दि. १८/०९/२०२५ ते २५/०९/२०२५ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी– दि.२६/०९/२०२५, वैध नामनिर्देशपत्रांची यादी– दि.२९/०९/२०२५, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दि.१३/१०/२०२५ व मतदान दि.२६/१०/२०२५ अशा महत्त्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

(ए. वाय. दीक्षित)
निवडणूक निर्णय अधिकारी
प्रतिभा निकेतन महाविद्यालय सेवकांची
सहकारी पतसंस्था म.नांदेड
(मो. ७३८५९४६३५३)

# मराठी भाषेच्या प्रचारासाठी निबंध लेखन व मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा स्पर्धेचे आयोजन

**नवी दिल्ली**–मराठी भाषेचा प्रसार आणि विकास व्हावा यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली आणि राज्यमराठी विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध लेखन आणि मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ५ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ०१ ऑक्टोंबर २०२५ आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येकी २५ रुपये शुल्क आकारले जाईल, आणि दोन्ही परीक्षा प्रत्येकी दोन तासांच्या असतील.

स्पर्धेत विविध वयोगटांसाठी तीन गट आणि वैविध्यपूर्ण विषय ठेवण्यात आले आहेत. गट क्र. १ (१२ ते १६ वर्षे, १५०-५०० शब्द) मध्ये 'स्वातंत्र्यवीर सावरकर – एक अलौकिक व्यक्तिमत्त्व, 'खेळामुळे मिळणारे जीवनाचे धडे, 'माझी आई सर्वकाही हे विषय आहेत. गट क्र. २ (१७ ते ३० वर्षे, ५००-१००० शब्द) मध्ये 'यशासाठी आहार आणि विहार, 'फेक बातम्या व सूचनांचा अतिभार – एक गंभीर विषय', 'मराठी भाषेचा वापर हीच मराठी भाषेची जपणूक आहे' हे विषय देण्यात आले आहेत. गट क्र. ३ (१०००-१५०० शब्द) मध्ये 'पुण्यश्लोक देवी आहिल्याबाई होळकर यांची राष्ट्रभक्ती, मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याच्या माध्यमातून तरुण पिढीला प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट या स्पर्धे द्वारे साध्य केले जाणार आहे. मराठी परीक्षेच्या पाच स्तरांमध्ये परिचय, प्राज्ञ, मध्यमा, कोविद प्रथम आणि कोविद द्वितीय यांचा समावेश आहे.

अधिक माहितीसाठी किंवा अर्ज भरण्यासाठी संपर्क साधावा: परीक्षा कार्यालय, ५६-बी, वैशाली नगर, इंदूर – ४५२००९. फोन: ८३२९४२३८६४,७३८९२९३९९७. इच्छुकांनी त्वरित अर्ज सादर करावेत, असे आवाहन संस्थेने केले आहे. दिल्ली व दिल्लीच्या आसपास परिसरासाठी केंद्र प्रमुख श्रीमती शशी कुलकर्णी (मो.क्र ९८६८०२३०६४) यांच्याशी संपर्क साधावा.

# व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र त्रुटी पूर्तता करण्याचे आवाहन

**मुंबई(प्रतिनिधी)** –शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मधील विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग तसेच एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.

जात वैधता प्रमाणपत्राच्या अभावामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये, याकरिता ज्यांनी अद्याप त्रुटी पूर्तता केलेली नाही त्यांनी तातडीने संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), चे महासंचालक तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्याचे मुख्य समन्वयक, सुनील वारे यांनी केले आहे.

राज्यात सुरु असलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदतवाढ शासनाने दिली आहे. तथापि, अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही. संबंधित समित्यांमार्फत एसएमएस, ईमेल व पत्राव्दारे वारंवार सूचना दिल्यानंतरही अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह समित्यांशी संपर्क साधलेला नाही, असे दिसून आले आहे.

## जाहीर प्रगटन
## यादवेश को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी म. नांदेड, ता. जि. नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करिता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत असून, उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी– दि.१८/०९/२०२५ ते २५/०९/२०२५ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी– दि.२६/०९/२०२५, वैध नामनिर्देशपत्रांची यादी– दि.२९/०९/२०२५, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि.१३/१०/२०२५ व मतदान दि.२६/१०/२०२५ अशा महत्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**(बी. बी. बोधगिरे)**
निवडणूक निर्णय अधिकारी
यादवेश को-ऑप. क्रेडीट सोसायटी म.नांदेड
(मो. ७०२०४६८६५२)

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
वा. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २००/२०२५ पुढील तारीख–१५.१०.२०२५

अर्जदार ०१. सरस्वतीबाई भ्र. हणमंत तिपनोड वय ६५ वर्षे, धंदा–घरकाम, ०२. गंगाधर पि. हणमंतराव तिपनोड वय ४५ वर्षे, धंदा–शेती, ०३. विनोद पि. हणमंतराव तिपनोड वय ४१ वर्षे, धंदा–शेती, ०४. संतोष पि. हणमंतराव तिपनोड वय ३८ वर्षे, धंदा–शेती. वरील सर्व रा. चिरली ता. बिलोली, जि. नांदेड. ०५. अरुणा भ्र. दोड्डीमिडी त्र्यंबक वय ५० वर्षे, धंदा–घरकाम, रा. हंगेरगा ता. कोटगिरी, जि. निझामाबाद.

गैरअर्जदारः विरुद्ध
निरंक

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हे मयत हणमंत गंगाराम तिपनोड यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ही मयत हणमंत गंगाराम तिपनोड यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे मुले आहेत व अर्जदार क्रमांक ०५ हि मुलगी आहे. मयत हणमंत गंगाराम तिपनोड यांचा मृत्यू दिनांक ०१.०४.२०२१ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की. अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ यांना मयत हणमंत गंगाराम तिपनोड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर भयत यांचे कायदेशीर वास्स असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून
क. लिपीक सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, बिलोली

# नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारती शासनाच्या नमुना नकाशानुसारच बांधणे बंधनकारक

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील नगरपरिषदा तसेच नगरपंचायतींच्या प्रशासकीय इमारती आता शासनाने तयार केलेल्या नमुना नकाशानुसारच (टाईप प्लॅन) बांधणे बंधनकराक करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

नगरपरिषदा व नगरपंचायत, पदाधिकारी तसेच अधिकारी व कर्मचारी यांची संख्या व शहरांची लोकसंख्या विचारात घेऊन नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा नमुना नकाशा सार्वजनिक बांधकामा विभागाचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांच्याकडून मंजूर करुन घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींनी नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम या नमुना नकाशाप्रमाणे करणे बंधनकारक असणार आहे. ज्या ठिकाणी यापूर्वी प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे मात्र काम सुरू झाले नाही अशा ठिकाणी देखील आता नविन नमुना नकाशानुसारच बांधकाम करावे लागणार आहे. ज्या शहरात नगरपरिषद अथवा नगरपंचायतीची प्रशासकीय इमारत नाही तेथे प्राधान्याने या कामासाठी निधी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्यातील वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण तसेच नविन तंत्रज्ञान या सर्व बाबी लक्षात घेता नगरपरिषदा-नगरपंचायतींच्या जबाबदाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नागरीकांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, त्यांच्या तक्रारीचे वेळेत निराकरण करणे, वाढत्या संगणकीकरणामुळे सर्व नगरपरिषदा- नगरपंचायतीमध्ये अद्ययावत ई-कार्यप्रणालीचा संपूर्ण राज्यात अवलंब होण्यासाठी प्रशासकीय इमारतींमध्ये आवश्यक असणाऱ्या बाबींचा समावेश होण्यासाठी हा नमुना नकाशा तयार करण्यात आला आहे.

## झाडे लावा, झाडे जगवा

## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार महेंद्र अंबादास हटकर वय ४० रा. डॉ. आंबेडकर नगर नांदेड ता. जि. नांदेड मो. नं. ८४८२९०५१७७ यांनी या कार्यालयात त्यांचे मुलींचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरिता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव अपर्णा महेंद्र हटकर वय १३ रा. डॉ. आंबेडकर नगर नांदेड ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा मान्नीकर हॉस्पीटल, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १४/०२/२०११ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २८/८/२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक – १०/९/२०२५
स्थळ – नांदेड

तहसीलदार,
नांदेड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार संभाजी परसराम पुयड वय ५५ वर्षे, धंदा–शेती, रा. पुणेगाव ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून जाहीर प्रगट देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी गजानन प्रभाकर कदम वय ३५ वर्षे, धंदा–शेती, रा. वाडी पुयड ता. जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौजे ग्रामपंचायत तुप्पा ता. जि. नांदेड येथील मालमत्ता क्र. २१३३ मधील प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ११७ असून ज्याची लांबी पूर्व–पश्चिम ७.६२ मीटर व दक्षिण–उत्तर ४५.२४ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ ११६.१३ चौ. फुट म्हणजेच १२४९ चौ. फुट असून ज्याची चतुसिमा पुढीलप्रमाणे आहे.

पूर्वेस – ६.१० मी. रस्ता (रोड) आहे. पश्चिमेस–प्लॉट नं. ११८ आहे. दक्षिणेस–९ मिटर रस्ता (रोड) आहे. उत्तरेस :–ओपन स्पेस आहे.

वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट माझ्या पक्षकाराने गजानन प्रभाकर कदम व ३५ वर्षे धंदा– शेती रा. वाडी पुयड ता. जि. नांदेड यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा करार केला आहे. व सदर प्लॉट संभाजी परसराम पुयड यांनी सौदाचिठ्ठी आधारे विकत घेतलेला आहे. माझ्या पक्षकाराने बयानापोटी (ईसार) रक्कम दिलेली आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचे काही हितसंबंध, वारसा हक्क, भाऊबंदकी, वाद, न्यायप्रविष्ठ प्रकरण, भूसंपादन अथवा शासकीय अथवा निमशासकीय बोजा, कर्ज, गहाण, तारण इत्यादी कोणत्याही स्वरुपाचे उजर अथवा आक्षेप असल्यास सदर प्रकरण प्रसिद्धी दिनांकापासून ०७ दिवसापर्यंत आपल्या मूळ कागदपत्रसहीत पुढील कार्यालयात लेखी आक्षेप नोंदवावे, दिलेल्या मुदतीत कोणाचे आक्षेप, उजर नाही आल्यास सदर मिळकत निर्विवादीत गृहीत धरून माझे पक्षकार दुय्यम निबंधक कार्यालय नांदेड येथे नोंदणीकृत खरेदीखत करून घेतील. मुदतीनंतर आलेले आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करिता हे जाहीर प्रगटन लिहून देत आहे.

| मार्फत | पक्षकार |
| --- | --- |
| अ‍ॅड. आत्माराम पि. सोनटक्के | संभाजी परसराम पुयड |
| आरत सरकार नोटरी | रा. पुणेगाव, ता. जि. नांदेड |
| नांदेड जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड | मो. ९७६४४२८७७७ |
| मो.नं. ९८९०५१३२१२ | |

## टी.सी., हरवली आहे

माझी भाग्यश्री सटवा रेडे या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. नांदेड ते कापसी गुंफा दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–सटवाजी निवास, कापसी गुंफा, ता. लोहा, जि. नांदेड **मो. ९५१८९४२६१८**

## टी.सी., हरवली आहे

माझी ऋतुजा साहेबराव इंगळे या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. माहुर ते पुसद दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–ऋतुजा साहेबराव इंगळे मु. मुरली, पो. लखमापूर, ता. माहुर, जि. नांदेड **मो. ८३९०३३६०२४**

## जाहीर प्रगटन
## मंगलमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. बळीरामपूर, ता. जि. नांदेड

मंगलमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित बळीरामपूर ता. जि. नांदेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५ ते २०३० साठीची प्रारूप मतदार यादी संस्थेने कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर मंगलमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित बळीरामपूर ता. जि. नांदेड येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदार यादीवर संस्थेच्या सभासदांपैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक १७/०९/२०२५ ते २४/०९/२०२५ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

**(एस. बी. जोशी)**
निवडणूक निर्णय अधिकारी
मंगलमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्यादित बळीरामपूर ता. जि. नांदेड
मो. ९४०३०६७९२५

अध्यक्ष/सचिव
मंगलमूर्ती सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित बळीरामपूर ता. जि. नांदेड
मो. ९६३७३०६८३५

## जाहीर प्रगटन
## महात्मा फुले शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था म. नांदेड, ता. जि. नांदेड

या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२५ ते २०३० करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी– दि.१८/०९/२०२५ ते २५/०९/२०२५ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी– दि. २६/०९/२०२५, वैध नामनिर्देशन पत्रांची यादी– दि.२९/०९/२०२५, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि.१३/१०/२०२५ व मतदान दि.२६/१०/२०२५ अशा महत्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**(एम. आर. येवते)**
निवडणूक निर्णय अधिकारी
महात्मा फुले शिक्षक कर्मचारी
सहकारी पतसंस्था म.नांदेड
(मो. ९८२३५०५८१४)

VEHICLE FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech no | Year | Model |
| --- | --- | --- |
| MH-26-CP-2936 | 2024 | JOHN DEERE - 5050 D |
| | | |
| | | |

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **20/09/2025**. Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar complex, Bafna T- Point, Nanded 431601
PH-8976898557, 8657758854

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज जिल्हास्तरीय अभियानाचा पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते शुभारंभ



**नांदेड (प्रतिनिधी)** –गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात गावस्तरावरील प्रत्येक नागरिकाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज जिल्हास्तरीय अभियानाचा शुभारंभ बुधवारी पिंपळगाव (म.) येथे पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ छत्रपती संभाजीनगर येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आला.

पिंपळगांव (म.) येथे आयोजित कार्यक्रमास राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, सहायक जिल्हाधिकारी अनन्या रेडी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) राजकुमार मुक्कावार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) दत्तात्रय गिरी, सरपंच वर्षा खंडागळे यांच्यासह गावातील नागरिक यांची उपस्थिती होती.

पालकमंत्री पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा कालावधी शंभर दिवसाचा असून या कालावधीत गावस्तरावर अभियानाचे मुख्य सात घटक आहेत. यामध्ये सुशासन, आर्थिक स्वावलंबन, जलसमृद्धी, योजनांचे अभिसरण, संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास आणि लोकसहभाग यावर भर देण्यात येणार आहे, अशी माहिती पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

यावेळी राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी केले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मनपात अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ध्वजारोहण कार्यक्रम पार पाडला. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मनपा आयुक्त डॉ. महेश–कुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून महापालिकेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना Officer of the month व Employee of the month हा पुरस्कार देण्यात येतो.

माहे ऑगस्टमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल Officer of the month हा पुरस्कार उपअभियंता सतीश निवृत्ती ढवळे यांना आयुक्तांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ढवळे यांनी मागील महिन्यात शहरामध्ये विविध प्रभागात शासनाच्या विविध योजनेअंतर्गत नवीन प्रकारचे डेकोरेटिव्ह लाईट बसविणे, हायमास, एलईडी लाईट बसविणे, तसेच सिग्नलची देखभाल, दुरुस्तीची कामे योग्य पद्धतीने केली. त्याचप्रमाणे मनपाच्या मुख्य इमारतीवर सौरऊर्जा सिस्टम कार्यान्वित करून पालिकेच्या विद्युत खर्चात बचत करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे व्हीआयपी मुख्य रस्त्याच्या दुभाजकावरील खांबावर तिरंगा लाइटिंग बसवून शहराच्या सौंदर्यामध्ये भर घालण्याचे काम केले. तसेच शहरामध्ये विविध कार्यक्रमानिमित्त आलेले देशाचे गृहमंत्री व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच विविध मंत्री यांच्या दौऱ्यानिमित्त सर्वत्र विद्युत व्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवली. या सर्व कामगिरीची दखल घेऊन आयुक्तांनी त्यांचा पुरस्कार देऊन सत्कार केला आहे.



तसेच Employee of the month साठी माहे ऑगस्टमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कंत्राटी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक रमा नागोराव कांबळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. रमा कांबळे यांनी मागील महिन्यात सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत येणारी कामे जसे की, रस्ते, नाली, सभागृह बांधकाम, इमारत, रस्ते व वार्षिक देखपाल दुरुस्तीची कामे, विविध योजनेची कामे ही सर्व कामे आजपर्यंत त्यांनी उत्तम रित्या पार पडली आहेत.

# काँग्रेस पक्ष कार्यालयात ध्वजारोहण




**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने नवा मोंढा येथील काँग्रेस पक्ष कार्यालय येथे जिल्हाध्यक्ष (द.) तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्यासह आनंद चव्हाण, बालाजी चव्हाण, प्रफुल्ल सावंत, माधवराव पवळे, नागराज सुलगेकर, गंगाधर सोनकांबळे, डॉ. करुणा जमदाडे, सत्यपाल सावंत, अजिज कुरेशी, ललिता कुंभारे, जेशिका शिंदे, हंसराज काटकबंळे, सुरेखा वैद्य, सिमोन नागोरे, प्रकाश दिपके, आदींसह बहुसंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वा. सै. आबासाहेब लहानकर यांच्या पुतळ्यास पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त शिवाजीनगर चौक, नांदेड येथील स्वातंत्र्य सैनिक आबासाहेब लहानकर स्तंभास नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे व माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी खा. अजित गोपछडे, भाजपाचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, माजी आ. अमरनाथ राजूरकर, संतुकराव हंबर्डे, किशोर देशमुख, राजेश कुंटूरकर, माजी महापौर मोहिनी येवनकर, कृउबा सभापती संजय देशमुख लहानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ॲड. सावित्री जोशी, सौ. सुनंदा कंजाटे, ॲड. माधवी जोशी, दत्तू देशमुख इंगोले, किशोर बारडकर, बाळासाहेब मोरे, अविनाश उंचेगावकर, अशोक चौधरी, राजकमलसिंघ गाडीवाले, डॉ. दिलीप धानोरकर, प्रा. डॉ. आबासाहेब कल्याणकर, विजयसिंह लाला, पद्माकर कल्याणकर, सुहास देशमुख, वैभव नालटे, सुधीर लहानकर, निलेश सुत्रावे, यशराज लहानकर आदींची उपस्थिती होती.

### ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने विचित्र अपघात

# सात जण जखमी



**मुखेडजवळील घटना**

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील मुखेड शहरात ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने विचित्र अपघाताची घटना घडली. या अपघातात ७ ते ८ जण जखमी झाले असून, तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. गंभीर जखमींना नांदेड येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत.

मुखेड शहरातील बाऱ्हाळी नाका येथे भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव वेगात येणाऱ्या एका ट्रकचे ब्रेक फेल झाल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघातात ७ ते ८ जण जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका काळ्या-पिवळ्या जीपला जोरदार धडक दिली. ट्रकने दिलेली ही धडक इतकी भीषण होती की, जीप जागेवरच पलटी झाली. याशिवाय ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ५ ते ६ मोटारसायकललाही चिरडले. त्यामुळे या विचित्र अपघातात दुचाकीसह तेथे रस्त्यावर असणारे ७ ते ८ जण जखमी झाले असून, त्यांना तातडीने मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारांसाठी नांदेड येथील रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे.

### नांदेड महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र निषेध

# खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते मीनाताई ठाकरेंच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक



**दोन दिवसांत माथेफिरुला अटक न केल्यास नांदेड बंदचा इशारा**

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुंबईत शिवाजी पार्क दादर येथील स्वर्गीय मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळ्याची अज्ञात व्यक्तीने विटंबना केली. त्या घटनेनंतर नांदेड शहरात आंदोलन करण्यात आले. नांदेड महानगर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे–तर्फे माथेफिरूला दोन दिवसांत अटक न केल्यास नांदेड शहर बंदचे आवाहन करण्यात आले. तसेच महाविकास आघाडी–तर्फे सदरील घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला.

नांदेड लोकसभेचे खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते स्वर्गीय मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. सदरील घटना अत्यंत निंदनीय असून, अशा प्रकारे घटना घडत असेल तर महाविकास आघाडी खपवून घेणार नाही, असा इशारा नांदेड लोकसभेचे खा. रवींद्र चव्हाण यांनी दिला. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी स्वर्गीय माँसाहेब यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून निषेध नोंदविला.

यावेळी माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, अब्दुल सत्तार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, श्रावण रॅपनवाड, प्रा. यशपाल भिंगे, राष्ट्रवादीचे सुनील कदम, भगवानराव आलेगावकर, कम्युनिस्ट पार्टी तर्फे कॉ. गंगाधर गायकवाड, विठ्ठल पावडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, जिल्हाप्रमुख बबन बारसे, महानगर प्रमुख प्रकाश मारावार, शहरप्रमुख जितूसिंग टाक, मनोज यादव, नवज्योतसिंग गाडीवाले, विजय बगाटे, यांनी तीव्र निषेध करून विटंबना करणाऱ्या माथेफिरूला दोन दिवसात अटक न केल्यास नांदेड महानगर शिवसेनेतर्फे नांदेड बंदचे आवाहन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी दिला.

# बैतुल उलूम शाळेच्या मुख्याध्यापक, लिपिकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांची टी.सी., निर्गम उतारा आदींचे अभिलेख देगलूर नाका परिसरातील शाळेत वर्ग न करता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्याची तक्रार देण्यात आली आहे. शासनाचा विश्वासघात केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात बैतूल उलूम माध्यमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक व कनिष्ठ लिपिकाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शहरातील नई आबादी भागात बैतुल उलूम उर्दू माध्यमिक शाळा आहे. या शाळे–मध्ये प्रभारी मुख्याध्यापक म्हणून मोहम्मद अब्दुल जमीर मोहम्मद अब्दुल खालिक व कनिष्ठ लिपीक म्हणून सलाम चाऊस कार्यरत आहेत. शासनाने त्यांना १६ एप्रिल २०२५ ते ११ जून २०२५ पर्यंत विद्यार्थ्यांची टीसी, निर्गम उतारा आदी अभिलेख सांभाळण्याची जबाबदारी दिली होती. तसेच सदरचे अभिलेख लगतच्या शाळेत वर्ग करून अहवाल देण्याचे कर्तव्य त्यांच्यावर सोपविण्यात आले होते. परंतु उपरोक्त दोन्ही आरोपींनी सदर अभिलेख लगतच्या शाळेत जमा केले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. याप्रकरणी उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पांडुरंग पाचंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात उपयोग दोन्ही आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे.

# सेवा पंधरवडाचा पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पंधरवडाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हास्तरावरील या कार्यक्रमाचा शुभारंभ राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते येथील जिल्हा नियोजन भवन येथे नुकताच संपन्न झाला.

यावेळी राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

या सेवा पंधरवड्यात राबविण्यात येणारे विविध उपक्रम हे मोहीम स्वरुपात राबविण्यात येणार आहेत. या कालावधीत सामान्य नागरिकांसाठी शासनाच्या विविध सेवा व नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तीन टप्प्यात साजरा करण्यात येत आहे. पहिला टप्पा १७ ते २२ सप्टेंबर, दुसरा टप्पा २३ ते २७ सप्टेंबर तर तिसरा टप्पा २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा कालावधीत राहणार आहे. पहिल्या टप्यात रस्ते सर्वेक्षण, दुसऱ्या टप्यात अतिक्रमणे नियमित करणे तर तिसऱ्या टप्यात नाविन्यपूर्ण उपक्रमात गाव तिथे दफन भूमी, गायरान जमिनीची जीओ फेन्सिंग लॅण्ड बँक तयार करणे, व्हॉटसपद्वारे तक्रार संकलन व निवारण करण्यात येणार आहे.

# युवासेनेच्या नांदेड दक्षिण जिल्हाप्रमुखपदी बाळू पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)**– युवासेना नांदेड जिल्हाप्रमुखपदी (दक्षिण व लोहा-कंधार विधानसभा) पहेलवान विठ्ठल (बाळू) पाटील मोरे यांची नुकतीच निवड केली आहे. त्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

शिवसेना उपनेते तथा मंत्री दर्जा असलेले आ. हेमंत पाटील व नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते बुधवारी नांदेड येथे नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, शहरप्रमुख तुलजेश यादव, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, उपजिल्हाप्रमुख जयवंतराव कदम, युवा तालुकाप्रमुख बालाजी पाटील सपुरे, बालाजी पाटील सपुरे, माजी नगरसेवक बाळासाहेब देशमुख तरोडेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.


# वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध मागण्यांची त्वरित अंमलबजावणी करा -खा. डॉ. अजित गोपछडे

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रात वीरशैव लिंगायत समाजाची मोठ्या प्रमाणावर वस्ती आहे. या समाजाने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाच्या उन्नतीसाठी राज्य शासनाने त्यांच्या विविध मागण्यांची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने बुधवारी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केली आहे.

शिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या हस्ते पालकमंत्र्यांना दिले आहे. यावेळी भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, रामदास पाटील सुमठाणकर, नागनाथ पाटील सावळीकर, डॉ. माधवराव पाटील उच्चेकर, खुशाल पाटील उमरदरीकर, डॉ. माधवराव कहाळेकर, बालाजी पांडागळे, किशोर स्वामी, बाबाराव भाले यांच्यासह भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, लक्ष्मणराव ठक्करवाड, राजेश कुंटूरकर, राजू एकलारे, सिद्राम पांडागळे, गोविंद माकणे, रुपेश पाटील भोकसखेडकर आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री अतुल सावे हे बुधवारी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने नांदेड येथे आले होते. त्यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण पार पडल्यानंतर खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वात वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने पालकमंत्र्यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यात वीरशैव लिंगायत समाजास ओबीसीमधून सरसकट आरक्षण द्यावे. महात्मा बसवेश्वर अर्थिक विकास महामंडळाची स्वतंत्र रचना करणे आणि त्याचे सक्षमीकरण होणेसाठी १००० कोटी रुपयांची तरतूद करणे. महाराष्ट्रातील शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या महानगरात वसतिगृह व अभ्यासिकांची उभारणी करणे. समाजाच्या उन्नतीसाठी सारथी, महाज्योती सारखी स्वतंत्र संस्था उभारणी करणे. समाजातील MPSC /UPSC करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक साह्यता देणे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये जगतज्योती महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राची स्थापना करणे. मंगळवेढा येथे भव्य महात्मा बसवेश्वर स्मारकाची उभारणी करणे. अशा प्रमुख सात मागण्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या मागण्या ठेवाव्यात. त्या मंजूर करून घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी अशी मागणी यावेळी पालकमंत्र्यांकडे करण्यात आली.

**संजय कौडगे यांची शिष्टमंडळासह पालकमंत्र्यांकडे मागणी**




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com